cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–८६ | मंगळवार दि.१६ जून २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### भेसळीच्या विळख्यातून मुक्तीची लढाई

अन्न, वस्त्र आणि निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा मानल्या जातात. यापैकी अन्न ही केवळ गरज नसून मानवी आरोग्याचा आणि जीवनाचा आधारस्तंभ आहे. मात्र, दुर्दैवाने गेल्या काही वर्षांत याच अन्नामध्ये भेसळ करण्याचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढले आहे. नफा कमावण्याच्या हव्यासापोटी नागरिकांच्या आरोग्याशी सर्रास खेळ सुरू आहे. अशा पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे नवनियुक्त अन्न व औषध प्रशासन (एफडीए) आयुक्त तुकाराम मुंढे यांनी भेसळखोरीविरोधात उभारलेली मोहीम केवळ प्रशासकीय कारवाई नसून जनआरोग्याच्या संरक्षणासाठी सुरू केलेला निर्णायक लढा आहे.

# शेतकरी प्रश्नी काँग्रेस आक्रमक

## छत्रपती संभाजीनगरमध्ये रास्तारोको, ५ किमीपर्यंत वाहनांच्या रांगा

संभाजीनगर । प्रतिनिधी

**शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नी काँग्रेसने सोमवारी (दि. १५ जून) आक्रमक भूमिका घेत छत्रपती संभाजीनगरमध्ये रास्तोरोको आंदोलन केले. छत्रपती संभाजीनगर शहराच्या बाहेरील केंब्रिज चौकात हे आंदोलन करण्यात आले. काँग्रेस कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांनी चारही बाजूने येणारा रस्ता अडवल्याने वाहनांच्या ५ ते ६ किलोमीटरपर्यंत रांगा दिसून आल्या. यामुळे पोलिसांनी रस्त्यात ठिय्या मांडून बसलेले खासदार डॉ. कल्याण काळे आणि काही काँग्रेस पदाधिकाऱ्यांना ताब्यात घेतले. यावेळी पोलिस आणि आंदोलनकर्त्यांमध्ये झटापट झाली.**



कडक ऊन आणि त्यात तापमानाचा पारा ४० अंश सेल्सिअसच्या वर गेला आहे. अशा परिस्थितीत वाहतूक कोंडी झाली. यामुळे आंदोलनकर्त्यांना रस्त्यावरून बाजूला करण्यात आले. पोलिसांनी खासदार काळे यांना रस्त्यावरून उचलून नेत ताब्यात घेतले. या आंदोलनदरम्यान सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. केंब्रिज हा छत्रपती संभाजीनगर शहराबाहेरील सर्वात मोठा चौक आहे. येथून जालना, छत्रपती संभाजीनगर, जळगाव आणि बीडकडे जाणारा रस्ता आहे. या मार्गावर नेहमीच वाहनांची मोठी ◂◂ पान २ वर

## खुशखबर! १८ जूनपासून पावसाचा अंदाज



पुणे । प्रतिनिधी

**मान्सूनने सोमवारी (दि.१५) आंध्र प्रदेश व्यापला. त्या भागातून महाराष्ट्राला ताकद मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. राज्यात लवकरच मान्सून सक्रिय होण्याची चिन्हे दिसत असून, अरबी समुद्र अन् बंगालचा उपसागर अशा दोन्ही मान्सून शाखा आता एकत्र येण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे १८ ते २० जूनदरम्यान राज्यासह संपूर्ण देशात चांगल्या पावसाला सुरुवात होऊ शकते.**

अरबी समुद्रातील मान्सूनचा वेग फक्त महाराष्ट्रात मंदावला आहे. त्याखाली दक्षिण भारतात मुसळधार पाऊस आहे. याच शाखेतून मान्सूनने सोमवारी (दि.१५ जून) अवघा आंध्र प्रदेश आणि आजूबाजूची राज्ये व्यापली. त्यामुळे तेथून महाराष्ट्रातील थांबलेल्या मान्सून वाऱ्यांना बळकटी मिळू शकते. तसेच, बंगालच्या उपसागरातून वर गेलेल्या मान्सूनच्या दुसऱ्या शाखेने ईशान्य भारतासह प. बंगाल आणि बिहार व्यापले. अशा दोन्ही शाखा लवकरच एकत्र होऊन चांगल्या पावसाची शक्यता निर्माण झाली आहे. अंदाजानुसार महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, ओडिशा, झारखंड, बिहार, छत्तीसगडमध्ये पुढील ४ ते ५ दिवसांत मान्सून जोरदार सक्रिय होईल. उप-हिमालयीन पश्चिम बंगाल आणि सिक्कीम, अरुणाचलमध्ये वेगळ्या मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

## थोडक्यात...

### आरटीआय कार्यकर्ता व्यवसाय झालाय–न्यायालय

दिल्ली:रस्ता बांधकामाच्या कामात सरकारी कर्मचाऱ्याला अडथळा आणल्याचा आरोप असलेल्या एका माहिती अधिकार कार्यकर्त्याचा अटकपूर्व जामीन सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी (१५ मे) फेटाळला. हा जामीन फेटाळताना, ''माहिती अधिकार कार्यकर्ता असणे हा आता एक नवा व्यवसाय बनला आहे,'' अशी तोंडी टिप्पणी न्यायालयाने केली. ''आरटीआय कार्यकर्ते असणे हा आता एक नवा व्यवसाय झाला आहे. केंद्र सरकारने निधी दिला आहे, रस्ता बांधकामाची काळजी सरकार घेईल. तुम्ही कोणीही नाही आहात. कसले हे तथाकथित आरटीआय कार्यकर्ते! हे म्हणजे यलो जर्नलिझम (पित्त पत्रकारिता) आहे., अशा शब्दांत न्यायमूर्ती मेहता, न्यायमूर्ती बिश्नोई यांनी संताप व्यक्त केला आहे.

### केंद्राचा इथेनॉलइंधन वापराला हिरवा कंदील

मुंबई: केंद्र सरकारने नुकताच एक मोठा निर्णय घेतला. इराण आणि अमेरिका युद्धात जागतिक बाजारात सतत तेलाच्या किमतीमध्ये मोठी वाढ होत आहे. याचा फटका भारतात बसत आहे. सरकारने अधिक इथेनॉलचे प्रमाण असलेल्या पेट्रोलवर उत्पादन शुल्कात मोठी सलवत जाहीर केली होती. अधिसूचनेत नमूद केल्यानुसार, २२% ते ३०% दरम्यान इथेनॉल असलेल्या पेट्रोलवर कोणतेही उत्पादन शुल्क आकारले जाणार नाही. केंद्र सरकारने १००% इथेनॉल इंधनाला हिरवा कंदील दाखवला आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी ही घोषणा केली.

### तुकाराम मुंढेंच्या धास्तीने बाजारपेठ बंद

बुलढाणा: अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या धडक कारवाईची राज्यभर मोठी धास्ती निर्माण झाली आहे. बुलढाणा जिल्ह्यातील डोणगाव येथे सोशल मीडियावर 'एफडीएचे साहेब तपासणीसाठी येणार' अशी अफवा पसरताच काही मिनिटांत संपूर्ण बाजारपेठ बंद झाली. किराणा दुकाने, मिठाईची दुकाने, हॉटेल्स, पानटपऱ्या तसेच गुटखा-पानमसाला विक्रेत्यांनी तातडीने दुकाने बंद केली. ग्रामीण भागातही च्या कारवायांचा धाक वाढल्याचे चित्र दिसून येत आहे. दरम्यान, परळी येथे कारवाई होणार असल्याच्या चर्चेनंतर बीडमधील अनेक पानटपऱ्यांनीही आधीच कुलूप ठोकल्याची माहिती समोर आली आहे.




## अभिजीत दिपके यांना मारहाण करणारे तरुण पोलिसांच्या ताब्यात

जयपूर । प्रतिनिधी


**नीट परीक्षेतील कथित पेपर लीक आणि बेरोजगारीच्या मुद्द्यांवरून जयपुरात आयोजित करण्यात आलेल्या एका आंदोलनादरम्यान कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दिपके यांना काही जणांनी कानशिलात मारल्याची धक्कादायक घटना घडली. याप्रकरणी पोलिसांनी दोन तरुणांना ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे.**

जयपुरमधील शहीद स्मारक येथे तरुणांच्या विविध प्रश्नांवर कॉकरोच जनता पार्टीच्या वतीने एका मोठ्या आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते. या आंदोलनात मोठ्या संख्येने तरुण एकत्र आले होते. प्रत्यक्षदर्शी आणि पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अभिजित दिपके हे आंदोलनस्थळी पोहोचले तेव्हा त्यांचे समर्थक त्यांना उत्साहाच्या भरात खांद्यावर उचलून घेत होते. त्याच वेळी गर्दीत उपस्थित असलेल्या काही अज्ञात तरुणांनी त्यांना अचानक थप्पड मारली. या घटनेनंतर दिपके यांच्या संतप्त समर्थकांनी संबंधित आरोपींना पकडून मारहाण करण्यास सुरुवात ◂◂ पान २ वर

## २२ जूनपासून पावसाळी अधिवेशन

मुंबई । प्रतिनिधी

**महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचे वेळापत्रक निश्चित झाले आहे. या अधिवेशनाचे कामकाज एकूण ३ आठवडे चालणार आहे. मुंबईत २२ जून ते १० जुलै २०२६ या कालावधीत अधिवेशन होणार आहे. विधानसभा कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत याबाबत निर्णय घेण्यात आला.**



शेतमालाचे पडलेले भाव, शेतकरी कर्जमाफीच्या मुद्यावरुन विधिमंडळात चर्चा होण्याची शक्यता आहे. तसेच विविध महत्त्वपूर्ण विधेयके आणि राज्यातील ज्वलंत मुद्द्यांवर चर्चा होऊ ◂◂ पान २ वर

## भारत ग्राहक नव्हे, जगाचे प्रश्न सोडवणारा देश–पंतप्रधान

पॅरिस । वृतसंस्था

भारत आता केवळ जगातील तांत्रिक आणि आर्थिक उपायांचा ग्राहक राहिलेला नाही, तर अनेक जागतिक समस्यांवर उपाय सुचवणारा आणि त्यात योगदान देणारा देश बनला आहे असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी येथे रविवारी केले.

फ्रान्समधील भूमध्य समुद्रकिनारी असलेल्या नीस येथे आयोजित भारत इनोव्हेट्स २०२६ या कार्यक्रमाच्या उद्घाटनावेळी, फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष मॅक्रॉन यांच्या उपस्थितीत मोदी बोलत होते. मोदी म्हणाले की, भारतातील तरुण संशोधक आणि उद्योजक मानवजातीच्या हितासाठी उपयुक्त ठरणारे उपाय ◂◂ पान २ वर

## शहा यांनीच रचला तृणमूल खासदारांच्या बंडखोरीचा कट!

### काँग्रेसकडून गंभीर आरोप

दिल्ली । वृत्तसंस्था



अमित शहा यांनीच लोकसभा निवडणुकीत एनडीएला दोन-तृतीयांश बहुमत मिळवून देण्यासाठी या बेकायदेशीर बंडखोरीचा कट रचल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट करत शहा यांच्यावर टीका केली.

तृणमूल काँग्रेसच्या २० बंडखोर खासदारांनी नॅशनॅलिस्ट सिटिझन्स पार्टी ऑफ इंडिया या पक्षात प्रवेश केल्याने देशाच्या राजकीय वर्तुळात प्रचंड खळबळ माजली आहे. या सर्व घडामोडींवरून काँग्रेसने केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर तीव्र निशाणा साधला. गृहमंत्री अमित शहा हे सरदार ◂◂ पान २ वर

## जिल्हा परिषदेच्या शाळा खासगी शाळांपेक्षा अधिक चांगल्या-मुख्यमंत्री फडणवीस

रायगड । प्रतिनिधी

राज्यातील जिल्हा परिषदेच्या शाळा ९० टक्के खासगी शाळांपेक्षा अधिक चांगल्या आहेत, असा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी केला आहे. रायगड जिल्ह्यातील एका सरकारी शाळेत डिजिटल प्रयोगशाळेचे उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते.

फडणवीस म्हणाले, जिल्हा परिषदेच्या शाळांबद्दलची नकारात्मक धारणा आता बऱ्याच अंशी दूर झाली आहे.



विद्यार्थ्यांना डिजिटल साक्षर करण्यासाठी राज्य सरकार संपूर्ण महाराष्ट्रातील शाळांमध्ये अशाच प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून देत आहे. मी खात्रीने सांगू शकतो की, जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये दिले जाणारे शिक्षण हे ९० टक्के खासगी शाळांच्या तुलनेत अधिक चांगले आहे. एका काळी जिल्हा परिषदेच्या शाळा मोडकळीस आलेल्या इमारतींमधून चालत असत आणि तिथे मूलभूत सुविधांचा अभाव असे, परंतु आज त्यातील बहुतांश शाळा खासगी शाळांच्या बरोबरीच्या आणि काही बाबतीत तर त्यापेक्षाही सरस झाल्या आहेत. जिल्हा परिषदेच्या शाळांना लागलेला ◂◂ पान २ वर

## कोल्हापूर गॅझेटियर लागू करा–जरांगे पाटील

### राज्यात ५८ लाख नोंदी सापडलेल्या मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याचीही केली पुन्हा मागणी



कोल्हापूर । प्रतिनिधी

**राज्यात एकूण ५८ लाख नोंदी सापडल्या आहेत; त्यांना कुणबी प्रमाणपत्राचे वाटप करा. कोल्हापूर जिल्ह्यात १ लाख ४० हजार नोंदी सापडल्या आहेत. त्यांना ८ दिवसांत प्रमाणपत्र द्यावे, अशी मागणी मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे.**

जरांगे पाटील कोल्हापूर दौऱ्यावर आहेत. सोमवारी (दि. १५ जून) त्यांनी श्री अंबाबाई मंदिरात दर्शन घेऊन दौऱ्याची सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी काँग्रेसचे कोल्हापूरचे खासदार श्रीमंत शाहू महाराज छत्रपती यांची भेट घेत मराठा समाजाच्या हिताबाबत ◂◂ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.१३ जून २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६८.५० क्विंटल | २,००० | २,५०१ | २,२९९ |
| ज्वारी/हायब्रिड: ४८.५० क्विंटल | २,१६४ | ३,९२७ | २,८९२ |
| मका/लोकल: २.५० क्विंटल | २,०३० | २,०३० | २,०३० |
| तूर : ०.५० क्विंटल | ७,००० | ७,००० | ७,००० |
| उडीद : १.०० क्विंटल | ४,७०० | ४,७०० | ४,७०० |
| बाजरी: १६.०० क्विंटल | २,२९६ | २,४६५ | २,३८१ |
| मुग: ४.०० क्विंटल | ७,००१ | ७,००१ | ७,००१ |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | ६,७०० | ६,७०० | ६,७०० |
| हरभरा: १.५० क्विंटल | ५,३०१ | ५,४०० | ५,३५० |

# प्रकाशदा तुस्सी ग्रेट हो...पण मुंडेंचे मिठच आळणी

बीड । प्रतिनिधी

**स्व. गोपीनाथ मुंडे यांनी बीड जिल्ह्यामध्ये राजकारणातून जनतेने बाहेर केलेल्या अनेकांना सन्मानाने राजकारणात आणले. कालांतराने त्यांनाही धोका मिळाला. माझे मीठच आळणी हे शब्द आहेत खुद्द स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांचे. माजलगावचे आमदार प्रकाश दादा सोळुंके यांनी पुन्हा एकदा शीळ्या कडीला उतू आणत, परळीच्या मुंडे बहीण – भावांनी माझ्या पराभवासाठी षडयंत्र रचल्याचा आरोप केला. यात तथ्यही असेल, पण लोकसभा निवडणुकीत महायुतीच्या उमेदवाराचा पराभव झाला, त्यांचे काम प्रामाणिक केले, मोठ्या प्रमाणात मताधिक्य दिले हे देखील सांगायला हवे होते.**



मागील लोकसभा आणि त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीतील परिस्थिती जिल्ह्याने पाहिली आहे. त्याकाळी मराठा – ओबीसी असा वाद होताच हे नाकारता येणार नाही. मात्र लोकसभेला महायुतीचा उमेदवार पराभूत होतो हे जिल्ह्यातील सर्वाधिक लोकप्रतिनिधी असलेल्या महायुतीच्या मंडळींचाच पराभव मानावा लागेल. असे असतानाही भाजप उमेदवार पंकजा मुंडे यांनी मात्र कधीही नाराजी व्यक्त केली नाही. उलट विधानसभा निवडणुकीत अनेकांनी मुंडे बंधू-भगिनीवर विजय मिळवूनही खापर फोडले. असो, माजलगावचे आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी यापूर्वी देखील आपल्या मनातील खदखद व्यक्त केली होती. आता पुन्हा शेळ्या कडीला उतू आणण्याचे काम त्यांच्याकडूनच झाले. दादा तुम्ही ग्रेटच आहात, पण काही बाबीत आपणही प्रमाणिक असलेच पाहिजे. आपण एका कार्यक्रमात परळीच्या बहिण – भावाने माझ्या पराभवाचे षडयंत्र रचले. माजलगाव मतदारसंघाबरोबरच इतर मतदारसंघातही




ओबीसी उमेदवार जाणीवपूर्वक उभा केला, असे म्हणाला. आम्ही मराठा आंदोलनाला पाठिंबा दिला म्हणून हा विरोध होता. लोकसभेतील पंकजा मुंडे यांचा पराभव ही देखील कारण असू शकते. त्यावेळी संपूर्ण मराठा ◂◂ पान २ वर

### लोकसभेतील पराभवामुळे....

लोकसभेमध्ये झालेल्या पराभवामुळे हे षडयंत्र असल्याचा आरोप केला जात आहे. यामध्ये तथ्य असू शकते, पण महायुतीचा उमेदवार लोकसभेला असताना सर्वाधिक लोकप्रतिनिधी जिल्ह्यात महायुतीचे असताना देखीला उमेदवाराचा पराभव कसा होतो, याचेही आत्मपरीक्षण केले पाहिजे. पंकजा मुंडे यांचा पराभव झाला असला तरी त्यांनी दोष इतरांना दिला नाही त्यांनी तो पराभव स्वीकारला मात्र आपणाला विजय होऊन देखील तो स्वीकारता येत नाही. मुंडे बहीण भावावर खापर फोडने कितपत योग्य आहे, हे मतदार आता उघडपणे बोलत आहेत.

### सोळा वर्षानंतर मुंडेंमुळेच गुलाल लागला

१९७८ मध्ये सुंदरराव सोळुके यांच्या रूपाने बीड जिल्ह्याला उपमुख्यमंत्री मिळाले. मात्र त्यानंतर पुन्हा सोळुंके यांच्या कुटुंबियातील कोणालाच सत्तेची खुर्ची मिळाली नाही. १९८३ ते १९९९ पर्यंत म्हणजेच १६ वर्ष सत्तेपासून ते दूर असताना, स्व.गोपीनाथ मुंडे, स्व.पंडित अण्णा मुंडे यांच्याच पाठबळावर १९९९ मध्ये त्यांना गुलाल लागला हे देखील जगजाहीर सांगितले पाहिजे.

### म्हणजे ओबीसीने मतदानाच केले नाही...

आपण म्हणता माझ्या पराभवासाठी परळीच्या मुंडे बहीण भावांनी मोठे षडयंत्र रचले आणि ओबीसीचे उमेदवार उभे केल. तरीही आपला विजय झाला, पण आपल्या वक्तव्यामधून असे म्हणायचे का की नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये ओबीसीने तुम्हाला मतदानच केले नाही. याचा अर्थ तसाच निघतो. आपल्या मतदारसंघांमध्ये ओबीसींचे मतदान तुल्यबळ आहे, त्यामुळेच तर मुंडे यांच्या सभांसाठी निवडणुकीत आग्रह केला जात होता. त्यांनी सभा घेतल्या नसत्या आणि ओबीसी पुर्ण तुमच्या विरोधात असता तर माधव निर्मळ कदाचीत विजयी झाले असते.

cmyk

## अग्रलेख

# भेसळीच्या विळख्यातून मुक्तीची लढाई

अन्न, वस्त्र आणि निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा मानल्या जातात. यापैकी अन्न ही केवळ गरज नसून मानवी आरोग्याचा आणि जीवनाचा आधारस्तंभ आहे. मात्र, दुर्दैवाने गेल्या काही वर्षांत याच अन्नामध्ये भेसळ करण्याचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढले आहे. नफा कमावण्याच्या हव्यासापोटी नागरिकांच्या आरोग्याशी सर्रास खेळ सुरू आहे. अशा पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे नवनियुक्त अन्न व औषध प्रशासन (एफडीए) आयुक्त तुकाराम मुंढे यांनी भेसळखोरीविरोधात उभारलेली मोहीम केवळ प्रशासकीय कारवाई नसून जनआरोग्याच्या संरक्षणासाठी सुरू केलेला निर्णायक लढा आहे.

तुकाराम मुंढे हे राज्यातील कर्तव्यदक्ष, धाडसी आणि प्रामाणिक अधिकारी म्हणून परिचित आहेत. त्यांनी ज्या-ज्या विभागात काम केले, तेथे शिस्त, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यांना प्राधान्य दिले. अन्न व औषध प्रशासनाची धुरा स्वीकारताच त्यांनी भेसळयुक्त अन्नपदार्थ, बनावट मसाले, निकृष्ट दर्जाचे खाद्यतेल, दूषित दुग्धजन्य पदार्थ आणि अवैध उत्पादनांवर थेट हल्ला चढवला. राज्यभर राबविलेल्या धडक कारवायांमधून कोट्यवधी रुपयांचा भेसळयुक्त माल जप्त करण्यात आला. यामुळे अनेक वर्षांपासून निर्भयपणे सुरू असलेल्या भेसळखोरीच्या उद्योगाला मोठा धक्का बसला आहे. आज भेसळ हा केवळ ग्राहक फसवणुकीचा विषय राहिलेला नाही, तर तो सार्वजनिक आरोग्याचा गंभीर प्रश्न बनला आहे. खाण्याच्या पदार्थांमध्ये रसायने, कृत्रिम रंग, निकृष्ट दर्जाचे तेल, अपायकारक मिश्रणे आणि बनावट घटकांचा वापर होत असल्याच्या घटना वारंवार समोर येत आहेत. अशा पदार्थांचे सेवन केल्याने कर्करोग, यकृताचे विकार, मूत्रपिंड निकामी होणे, विषबाधा आणि इतर गंभीर आजार उद्भवू शकतात. त्यामुळे भेसळखोरी हा आर्थिक गुन्हा नसून समाजाच्या आरोग्यावर केलेला थेट हल्ला आहे. वास्तविक पाहता, भेसळखोरीची साखळी अत्यंत मजबूत आणि संघटित आहे. उत्पादनापासून वितरणापर्यंत अनेक स्तरांवर या अवैध उद्योगाचे जाळे पसरलेले आहे. अनेकदा राजकीय पाठबळ, भ्रष्ट प्रशासकीय घटक आणि आर्थिक स्वार्थ यांच्या संगनमतामुळे ही व्यवस्था अधिक बळकट होत जाते. त्यामुळे एखाद्या अधिकाऱ्याने केवळ छापेमारी करून प्रश्न सुटणार नाही. या साखळीच्या मुळावर घाव घालण्याचे धैर्य आणि सातत्य आवश्यक असते. मुंढे यांनी हे आव्हान स्वीकारले आहे, हीच या मोहिमेची सर्वात मोठी जमेची बाजू आहे. गुटखा, पानमसाला आणि इतर तंबाखूजन्य पदार्थांच्या अवैध उत्पादन व विक्रीविरोधातील त्यांची भूमिका देखील तितकीच महत्त्वाची आहे. महाराष्ट्रात गुटखाबंदी लागू असतानाही राज्याच्या कानाकोपऱ्यात गुटखा सहज उपलब्ध होतो, ही वस्तुस्थिती आहे. याचा अर्थ बंदी फक्त कागदावर आहे. तंबाखूजन्य पदार्थांच्या उत्पादन, साठवणूक, वाहतूक आणि विक्री करणाऱ्यांवर मकोकासारख्या कठोर कायद्यांतर्गत कारवाई करण्याचे निर्देश देऊन मुंढे यांनी या व्यवसायामागील संघटित गुन्हेगारीला थेट आव्हान दिले आहे. गुटख्यामुळे हजारो कुटुंबांनी आपले कर्ते पुरुष गमावले आहेत. कर्करोगासारख्या असाध्य आजारांचे प्रमाण वाढण्यामागे याच व्यसनांचा मोठा वाटा आहे. त्यामुळे या क्षेत्रातील कठोर कारवाईला लोकसमर्थन मिळणे स्वाभाविक आहे.

अन्नाइतकाच औषधांचा प्रश्नही महत्त्वाचा आहे. आज अनेक खासगी रुग्णालये रुग्णांना त्यांच्या स्वतःच्या मेडिकल स्टोअरमधूनच औषधे खरेदी करण्यास भाग पाडतात. यामुळे औषधांच्या किंमतीत कृत्रिम वाढ होते आणि रुग्णांच्या आर्थिक शोषणाला खतपाणी मिळते. उपचार सुरू असल्याने नातेवाईकांना विरोध करण्याची हिंमत होत नाही. अशा परिस्थितीत रुग्णांना रुग्णालयाबाहेरून औषधे खरेदी करण्याचा अधिकार मिळवून देण्याच्या दिशेने एफडीएने घेतलेली भूमिका स्वागतार्ह आहे. आरोग्यसेवा ही सेवा राहण्याऐवजी व्यवसाय बनत चालली असताना अशा हस्तक्षेपांची नितांत गरज आहे. मेडिकल इंडस्ट्रीत बनावट औषधे, निकृष्ट दर्जाची उत्पादने, ऑनलाइन औषध विक्रीतील त्रुटी आणि औषधांच्या किंमतींतील अनियमितता यांसारख्या अनेक समस्या वाढत आहेत. या सर्व क्षेत्रांमध्ये प्रभावी नियमन आणि कठोर अंमलबजावणी आवश्यक आहे. नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न असल्याने यात कोणतीही तडजोड परवडणारी नाही.

आजच्या काळात अनेक सरकारी विभाग निष्क्रिय, उदासीन किंवा भ्रष्टाचाराच्या विळख्यात अडकलेले असल्याची भावना सामान्य नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. अशा वेळी तुकाराम मुंढे यांच्यासारखा अधिकारी पुढाकार घेऊन व्यवस्था हलवतो, तेव्हा लोकांच्या मनात प्रशासनाविषयीचा विश्वास पुन्हा निर्माण होतो. मात्र, ही लढाई केवळ एका अधिकाऱ्याची राहता कामा नये. शासन, प्रशासन, न्यायव्यवस्था, माध्यमे आणि नागरिक यांनी एकत्रितपणे भेसळखोरीविरोधात उभे राहणे आवश्यक आहे. भेसळखोरी, अवैध गुटखा व्यवसाय आणि आरोग्य क्षेत्रातील शोषण या समस्या केवळ कायद्याच्या चौकटीत मावणाऱ्या नाहीत; त्या समाजाच्या नैतिकतेशी निगडित आहेत. त्यामुळे या लढ्याला व्यापक लोकचळवळीचे स्वरूप देण्याची गरज आहे. तुकाराम मुंढे यांनी या दिशेने टाकलेले पाऊल आशादायक आहे. आता या मोहिमेचा वेग कायम ठेवत भेसळखोरीच्या संपूर्ण साखळीचा बिमोड करणे हीच खरी कसोटी असेल. महाराष्ट्राला आज अशाच धाडसी आणि लोकाभिमुख प्रशासनाची गरज आहे. त्यामुळे अनेक क्षेत्रांत पसरलेल्या सुस्त आणि लकवाग्रस्त व्यवस्थेला जागे करण्यासाठी 'मुंढे पॅटर्न' हा केवळ पर्याय नसून काळाची गरज ठरत आहे.

# परतुर कृषी उत्पन्न बाजार समितीला २ कोटी १२ लाखाच उत्पन्न

## आ.बबनराव लोणीकर व सभापती राहुल लोणीकर यांच्या प्रयत्नामुळे उत्पन्नामध्ये वाढ

**परतुर । प्रतिनिधी**

**परतुर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सूत्रे हाती घेतल्यापासून माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली सभापती राहुल लोणीकर यांच्या नेतृत्वाखालील संचालक मंडळाने उत्तम कामगिरी केलेली असून चालू आर्थिक वर्षामध्ये कृषी उत्पन्न बाजार समितीने ०२ कोटी १२ लक्ष उत्पन्न मिळवले असून कृषी उत्पन्न बाजार समितीच्या स्थापनेपासून आत्तापर्यंत कृषी उत्पन्न बाजार समितीने उत्पन्नाचा एवढा टप्पा कधीही गाठला नव्हता या पार्श्वभूमीवर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाच्या झालेल्या बैठकीमध्ये आज सभापती राहुल लोणीकर यांचा सर्व संचालकांच्या वतीने व कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सचिवासह कर्मचाऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.**

गेल्या वर्षी कृषी उत्पन्न बाजार समितीने चांगली कामगिरी करत एक कोटी ५५ लाख उत्पन्न मिळवले होते मात्र यावर्षी तब्बल ६६ लाख रुपयांची वाढ कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उत्पन्नात झाली असून ०२ कोटी १२ लाख रुपये इतके उत्पन्न झालेले असून त्याचे संपूर्ण श्रेय सभापती राहुल लोणीकर उपसभापती व त्यांच्या सर्व संचालक मंडळात जाते. ज्यावेळी सभापती म्हणून राहुल लोणीकर यांनी पदभार स्वीकारला होता त्यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे उत्पन्न केवळ ९६ लक्ष रुपये होते मात्र गेल्या तीन वर्षात हा आलेख राहुल लोणीकर यांच्या नेतृत्वात चढत गेला असून त्यामुळे येत्या काळात लवकरच परतूर कृषी उत्पन्न बाजार समितीला अ दर्जा प्राप्त होणार आहे. यावेळी संचालक मंडळाला संबोधित करताना सभापती राहुल लोणीकर म्हणाले की, कृषी उत्पन्न बाजार समिती ही खऱ्या अर्थाने शेतकरी वर्गाच्या हितासाठी



असून व्यापारी व शेतकरी समन्वय राखत हा प्रगतीचा टप्पा आपण गाठू शकलो असल्याचे सांगितले पुढे बोलताना ते म्हणाले की पश्चिम महाराष्ट्रातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या धर्तीवर परतुर कृषी उत्पन्न बाजार समितीचा विकास करण्याचा आपला प्रयत्न असून सर्व संचालक मंडळ ही या कामांमध्ये सदैव खंबीर भूमिका घेत असल्यामुळे हे यश मिळाले असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले यापुढेही प्रगतीचा आलेख उंचावत जाऊन शेतकऱ्यांना सुविधा उपलब्ध करून देण्यावर आपला भर राहणार असल्याचे राहुल लोणीकर यांनी सांगितले पुढे बोलताना सभापती राहुल लोणीकर म्हणाले की लवकरच वाटूर उपबाजार पेठ येथे शेतकऱ्यांसाठी शेतकरी भवन उभारले जाणार असून, पुढील वर्षी सातोना येथे शेतकरी भवन उभारण्याचा संकल्प असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले पुढे बोलताना ते म्हणाले की शेतकऱ्यांना सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार असल्याचे सांगत टप्प्याटप्प्याने कृषी उत्पन्न बाजार समितीला विकसित करण्याचा आपला मानस असल्याचे ते म्हणाले पुढे ते म्हणाले की, व्यापारी आणि शेतकऱ्यांना सोयीस्कर होईल अशी एकत्रित बाजारपेठ निर्माण करण्याचा आपला प्रयत्न असून, या प्रयत्नाला यश मिळाल्यास निश्चितच परतूर कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांचा आणि व्यापाऱ्यांचा मोठा फायदा होईल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. आपण गेल्या तीन वर्षांपूर्वी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सूत्रे हाती घेतल्यापासून क्रमाक्रमाने कृषी उत्पन्न बाजार समितीचा विकास करण्याचा प्रयत्न केलेला असून आज उत्पन्नात एवढी भरीव वाढ झाल्याचा आपल्याला आनंद असून यापुढेही बाजार समितीच्या उत्पन्न वाढीसाठी व शेतकऱ्यांच्या सुविधांसाठी आपण प्रयत्नशील राहणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले यावेळी उपसभापती संभाजी वारे, लक्ष्मणराव टेकाळे आप्पासाहेब खोसे बालासाहेब आकात पाराजी मुळे गुलाबराव अवचार शहाजी राक्षे हरिराम माने मदनराव हजारे, मेराजुद्दीन खतीब पद्माकर कवडे प्रशांत बोनगे गणेश आंबेकर नितीन जोगदंड सत्यनारायण अग्रवाल दिनेश होलानी विजय वाणी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव रामकिसन लिपणे यांची उपस्थिती होती

# पंतप्रधान मोदींनी देशात १२ वर्षांत रामराज्याची संकल्पना साकारली-शंकर देशमुख

**बीड । प्रतिनिधी**

**बीड येथील सोमेश्वर महादेव मंदिरात सुरू असलेल्या शांतीब्रह्म संत एकनाथ महाराज रामायण पारायणाच्या पावन प्रसंगी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधानपदाची सलग १२ वर्षे यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल भगवान श्रीरामचंद्रांचे विशेष पूजन व महाआरती करण्यात आली. यावेळी पंतप्रधान मोदी यांच्या दीर्घायुष्य, उत्तम आरोग्य आणि राष्ट्रसेवेच्या संकल्पांना अधिक बळ प्राप्त व्हावे, अशी प्रार्थना श्रीराम चरणी करण्यात आली.**



यावेळी बोलताना भारतीय जनता पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी सांगितले की, ''पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या १२ वर्षांत भारताने विकास, सुशासन, राष्ट्रीय सुरक्षा, गरीब कल्याण आणि सांस्कृतिक पुनर्जागरणाच्या क्षेत्रात अभूतपूर्व प्रगती साधली आहे. प्रभू श्रीरामांच्या आदर्शांवर आधारित रामराज्याची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी मोदी यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. देशमुख म्हणाले की, प्रधानमंत्री आवास योजना, उज्ज्वला योजना, जल जीवन मिशन, आयुष्मान भारत, पीएम किसान सन्मान निधी, स्वच्छ भारत अभियान यांसारख्या योजनांमुळे कोट्यवधी गरीब, शेतकरी, महिला आणि वंचित घटकांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडले आहे. तर दुसरीकडे राम मंदिर उभारणी, काशी विश्वनाथ धाम, महाकाल लोक आणि भारताच्या सांस्कृतिक वारशाच्या जतनासाठी घेतलेले निर्णय हे देशाच्या सांस्कृतिक अस्मितेला नवे बळ देणारे ठरले आहेत.जागतिक पातळीवर भारताचा सन्मान वाढविणे, आत्मनिर्भर भारताचा पाया मजबूत करणे, पायाभूत सुविधांचा विक्रमी विकास, डिजिटल क्रांती आणि जनतेला केंद्रस्थानी ठेवून राबविलेल्या योजनांमुळे मोदी यांचे नेतृत्व देशासाठी प्रेरणादायी ठरले आहे,'' असेही त्यांनी नमूद केले. या प्रसंगी उपस्थित भाविकांसमोर मोदी यांच्या १२ वर्षांच्या कार्यकाळातील विविध जनकल्याणकारी, विकासाभिमुख आणि राष्ट्रहिताच्या उपक्रमांचा आढावा सादर करण्यात आला. तसेच प्रभू श्रीरामांची कृपा पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारत राष्ट्रावर सदैव राहो, अशी सामूहिक प्रार्थना करण्यात आली. याप्रसंगी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथआण्णा शिराळे, बीड शहराध्यक्ष अशोक लोढा, ज्येष्ठ नेते प्रा. देविदास नागरगोजे, पत्रकार प्रमोद पुसरेकर, राजेंद्र चरखा यांच्यासह मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

# शिवसेनेच्या वतीने 'बळीराजा गर्जना ट्रॅक्टर रॅली'चे आयोजन

## शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे-गणेश वरेकर

**बीड । प्रतिनिधी**

**महायुती सरकारने जाहीर केलेली शेतकरी कर्जमाफी ही फसवी असून त्यामधील जाचक अटी व शर्ती तात्काळ रद्द करून राज्यातील शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्यात यावी, या प्रमुख मागणीसाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने मंगळवार, दि. १६ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता बीड येथे 'बळीराजा गर्जना ट्रॅक्टर रॅली'**चे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांनी दिली.**

याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात वरेकर यांनी सांगितले की, राज्यातील शेतकरी आजही आर्थिक संकटात सापडला असून सरकारकडून जाहीर करण्यात आलेल्या कर्जमाफीचा प्रत्यक्ष लाभ अनेक पात्र शेतकऱ्यांना मिळालेला नाही. कर्जमाफीतील विविध अटी व निकषांमुळे शेतकरी वंचित राहत असल्याने सरकारने सरसकट कर्जमाफी जाहीर करावी, अशी शिवसेनेची मागणी आहे. या मागणीसाठी आयोजित करण्यात आलेली ट्रॅक्टर रॅली सकाळी ९.३० वाजता बीड येथील शिवसेना मध्यवर्ती कार्यालय, सिद्धीविनायक कॉम्प्लेक्स येथे एकत्र येऊन सुरू होणार आहे. त्यानंतर शहरातील विविध महापुरुषांच्या स्मारकांना अभिवादन करत रॅली जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देणार आहे. या आंदोलनात शेतकरी बांधवांसह शिवसेनेचे जिल्हा, तालुका, शहर तसेच विविध आघाड्यांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी होणार आहेत.



सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणांविरोधात आवाज उठविण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी ही रॅली महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचेही वरेकर यांनी नमूद केले. दरम्यान, जिल्ह्यातील शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने ट्रॅक्टरसह उपस्थित राहून या आंदोलनाला बळ द्यावे आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधावे, असे आवाहनही गणेश वरेकर यांनी केले आहे.

## पान १ वरून...

### शेतकरी प्रश्नी काँग्रेस

वर्दळ असते. या मार्ग रोखल्याने मोठी वाहतूक कोंडी झाली. गेल्या आठवडाभरापासून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खत खरेदीसाठी मोठी अडचण येत आहे. छत्रपती संभाजीनगर आणि कोल्हापूर जिल्ह्यात प्रायोगिक तत्त्वावर खत खरेदीसाठी ऑनलाईन ॲपद्वारे नोंदणी केली जात आहे. पण यातील तांत्रिक अडचणींचा शेतकऱ्यांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. शेतकऱ्यांना पेरणी करायची आहे. पण पाऊस पडत नाही. त्यात खते मिळत नसल्याने शेतकरी अडचणीत सापडला आहे. राज्यातील अनेक भागात खत खरेदीसाठी शेतकऱ्यांना तासनतास रांगेत उभे राहावे लागत असल्याचे चित्र दिसून येत आहे. यामुळे शेतकऱ्यांमधून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

----------

### २२ जूनपासून पावसाळी

शकते. सरकारची कर्जमाफी योजना ही शेतकऱ्यांची मदत नसून दिशाभूल आहे. निवडणुकीपूर्वी सातबारा कोरा करू, संपूर्ण कर्जमाफी देऊ अशी आश्वासने देऊन सत्तेत आलेल्या सरकारने आता जाचक अटी लावून शेतकऱ्यांना कर्जमाफीपासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न केला आहे, असा आरोप विरोधकांकडून केला जात आहे. यावरुन पावसाळी अधिवेशनात सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात घमासान पाहायला मिळू शकते. राज्यातील महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीर मान्यता मिळावी यासाठी 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक २०२६' पावसाळी अधिवेशनात सादर करण्याची तयारी राज्य सरकारने केली आहे. महिला शेतकऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण होऊन त्यांच्या सर्वांगीण सक्षमीकरणाला चालना मिळावी यासाठी सर्वसमावेशक धोरण आखण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

------------

### शहा यांनीच रचला तृणमूल

पटेल यांच्यासारख्या दिग्गजांनी भूषवलेल्या पदाचा अपमान करत आहेत. त्यांनी अत्यंत लाजीरवाण्या पद्धतीने भारतीय लोकशाहीला खालच्या पातळीवर नेले आहे, असे रमेश म्हणाले. रविवारी तृणमूल काँग्रेसच्या २० बंडखोर खासदारांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांची भेट घेतली आणि त्रिपुरास्थित एनसीपीआय या नोंदणीकृत पण अनधिकृत राजकीय पक्षात विलीन होत असल्याची घोषणा केली. एनसीपीआय हा अत्यंत लहान पक्ष असून, २०२३ च्या त्रिपुरा विधानसभा निवडणुकीत या पक्षाच्या उमेदवारांना नोटापेक्षाही कमी मते मिळाली होती. जयराम रमेश यांच्या मते, हा सर्व प्रकार अमित शहा यांच्या रणनीतीचा भाग आहे. शहा यांनी केवळ तीन वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या एका अज्ञात पक्षासोबत टीएमसीच्या २० खासदारांचे बेकायदेशीर विलीनीकरण घडवून आणले. या धक्कादायक निर्णयामुळे आता एनसीपीआय हा पक्ष एनडीएमध्ये टीडीपी आणि जेडीयू पेक्षाही मोठा घटक पक्ष बनू शकतो, अशी भीती त्यांनी व्यक्त केली. तसेच, या अंडरहँड टॅक्टिक्समुळे टीडीपी आणि जेडीयूनेही आवाज उठवायला हवा, असे ते म्हणाले. दुसरीकडे, बंडखोर टीएमसी खासदार अरुप चक्रवर्ती यांनी सोमवारी सांगितले की, आम्ही पक्षात सुधारणा करण्याचा प्रयत्न करत आहोत. आम्हीच खरी टीएमसी असून पक्षाच्या निवडणूक चिन्हावर (घड्याळ/फूल) आमचा हक्क सांगण्यासाठी कायदेशीर लढाई लढू. मात्र, ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील मूळ तृणमूल काँग्रेसने हे पाऊल पूर्णपणे बेकायदेशीर असल्याचे म्हटले आहे. पक्षांतर बंदी कायद्यानुसार या सर्व २० खासदारांचे सदस्यत्व रद्द करण्यात यावे, अशी मागणी टीएमसीने लोकसभा अध्यक्षांकडे केली आहे.

--------------

### भारत ग्राहक नव्हे, जगाचे

विकसित करत आहेत. दहा वर्षांपूर्वी जग भारताकडे तंत्रज्ञान स्वीकारणारा देश म्हणून पाहत होते. पण, आज भारत तंत्रज्ञान पुरविणारा देश म्हणून उदयास येत आहे. या पार्श्वभूमीवर भारत इनोव्हेट्स हा भारतासोबत जागतिक नवोन्मेषाचा पुढचा अध्याय लिहिण्यासाठी जगाला दिलेला खुले निमंत्रण आहे असे मोदी म्हणाले. मोदींनी उच्च तंत्रज्ञान, संरक्षण, संशोधन आणि नवोन्मेष क्षेत्रांमध्ये सरकारने केलेल्या सुधारणांचा उल्लेख केला. त्यांनी सांगितले की, भारताची रिफॉर्म एक्स्प्रेस थांबणार नाही; ती पुढेही वेगाने धावत राहील. भारत-फ्रान्स संबंधांवर मोदी म्हणाले की, भारत आणि फ्रान्स यांच्यातील सहकार्य हे केवळ राजनैतिक संबंधापुरते मर्यादित नाही; तर ते विश्वास, नवोन्मेष, प्रेरणा व सामायिक दृष्टिकोनावर आधारित आहेत.

-----------

### अभिजीत दिपके यांना मारहाण करणारे तरुण

केली. मात्र, पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करत परिस्थिती नियंत्रणात आणली. या आंदोलनादरम्यान आंदोलकांनी हातात भ्रष्टाचार आणि पेपर लीक विरोधी घोषणांचे फलक धरले होते. तसेच परीक्षांमधील कथित गोंधळाची जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, अशी जोरदार मागणी करत आंदोलकांनी घोषणाबाजी केली. या संपूर्ण प्रकरणाचा तपास पोलीस करत असून, ताब्यात घेतलेल्या दोन तरुणांची चौकशी केली जात आहे. त्यांना विधायकपुरी पोलीस ठाण्यात नेण्यात आले. दिपकेंचा स्कार्फ ओढून त्यांना कानशिलात लगावल्याचे व्हिडीओत दिसत आहे. त्यांना समर्थकाच्या खांद्यावरुन खाली ओढण्याचा प्रयत्न देखील झाल्याचा दावा केला जात आहे.

----------

### कोल्हापूर गॅझेटियर लागू

चर्चा केली. श्रीमंत शाहू महाराजांकडून कोल्हापूर गॅझेटियरबाबत माहिती जाणून घेतली. कोल्हापूर संस्थानकडे असलेल्या पुराव्यासंदर्भातही चर्चा केल्याचे जरांगे यांनी सांगितले. कोल्हापूर जिल्ह्यात शिंदे समितीला १ लाख ४० हजार नोंदी सापडल्या आहेत. त्यातील केवळ ३० हजार कुणबी प्रमाणपत्र देण्यात आले आहेत. ज्यांच्या नोंदी सापडल्या आहेत; त्यांना जरी कुणबी प्रमाणपत्र दिले तरी जवळपास पावणेतीन लाख मराठा समाज आरक्षणात जाऊ शकतो. हे राधाकृष्ण विखे पाटील यांनी समजून घेणे गरजेचे आहे. कुणबी नोंदी गोरगरीब लेकरांच्या भविष्याच्या कामाला आल्या पाहिजेत, असे मत त्यांनी व्यक्त केले. महाराजांनी सांगितल्याप्रमाणे राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखालील मराठा उपसमितीने आणि शिंदे समितीने येथील दस्तावेज तपासणीकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे. कोल्हापूर संस्थानचा दस्तावेज आहे. तो पूर्ण स्वीकारल्यानंतर मराठा समाजाचे कल्याण होईल. त्यासाठी कोल्हापूर गॅझेटियर स्वीकारावे. कुणबीच्या शोधून प्रमाणपत्र वाटप करावे, अशी मागणी जरांगे पाटील यांनी केली.

--------------

### जिल्हा परिषदेच्या शाळा खासगी शाळांपेक्षा

कमी दर्जाचा शिक्का आता पुसला गेला आहे. अनेक जिल्ह्यांमध्ये खासगी शाळांमधून जिल्हा परिषदेच्या शाळांकडे वळणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढली आहे. नव्याने सुरू करण्यात आलेल्या या डिजिटल प्रयोगशाळेमुळे सर्व इयत्तांसाठी दृकश्राव्य (ऑडिओ-व्हिज्युअल) अभ्यासक्रम उपलब्ध होईल आणि ऑनलाइन परीक्षा घेणेही शक्य होईल. शिक्षक याचा वापर अध्यापनासाठी करू शकतील आणि तिथेच ऑनलाइन परीक्षाही घेतल्या जातील. आजच्या डिजिटल युगात, विद्यार्थ्यांना डिजिटल साक्षर करण्यासाठी हे एक उत्कृष्ट साधन आहे. मुलांना घटनात्मक मूल्ये आणि नागरिक म्हणून त्यांची कर्तव्ये यांची ओळख करून देण्यासाठी जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये मूल्य शिक्षण देखील सुरू करण्यात आले आहे. आपल्या मुलांना घटनात्मक मूल्यांची माहिती असायला हवी. त्यांना केवळ त्यांचे हक्कच नाही, तर त्यांची कर्तव्येही समजली पाहिजेत. तसेच स्वच्छता आणि पर्यावरणाबाबतही जागरूकता निर्माण केली पाहिजे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

-----------

### प्रकाशदा तुस्सी ग्रेट हो...

समाज भाजपाच्या विरोधात होता असे देखील प्रकाश दादा बोलून गेले. हे नवीन नाही, यापूर्वीही ते बोलले होते. मात्र शीळ्या कडीला उतू आणण्याचे कारण काय? मग या पाठीमागील इतिहासही आपण पाहिला पाहिजे आणि जनतेलाही सांगितला पाहिजे. १९६० मध्ये महाराष्ट्र स्वतंत्र झाला. सुरुवातीला १९६२ मध्ये झालेल्या निवडणुकीत माजलगावमधून श्रीपतराव कदम विजय झाले होते, मात्र सोळंके कुटुंबियांना पहिल्यांदा गुलाल लागला तो १९७८ मध्ये. १९७८ ते ८३ पर्यंत ते लोकप्रतिनिधी आणि राज्याचे उपमुख्यमंत्री देखील होते. परंतु त्यानंतर १९८३ ते १९९९ या सोळा वर्षाच्या कार्यकाळात माजलगाव मतदारसंघामध्ये सोळुंके यांचे प्रस्थ कमी झाले. म्हणजे जनतेने त्यांना नाकारले होते असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. त्यानंतर ९५ ते ९९ या कार्यकाळात बीड जिल्ह्यामध्ये आणि राज्यात स्व.गोपीनाथ मुंडे यांचा दबदबा वाढला. भाजपची ताकत हळूहळू वाढत गेली. भाजपकडे ब्राह्मणाचा पक्ष म्हणून पाहिले जायचे परंतु स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांनी कष्टकरी, कामगार, बहुजनांचा पक्ष म्हणून भाजपाला पुढे आणले आणि बीड जिल्ह्यात मोठी ताकद निर्माण केली, त्याच कार्यकाळात म्हणजे १९९९ मध्ये माजलगावमधून स्व.पंडित अण्णा मुंडे यांच्या आग्रहाखातर भाजप प्रवेशानंतर प्रकाश दादा सोळुंके यांना भाजपकडून उमेदवारी दिली गेली आणि तब्बल १६ वर्षाच्या संघर्षानंतर सोळुंके कुटुंबियांना गुलाल लागला. तोही स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या आशीर्वादामुळेच हे नाकारता येणार नाही. १९९९ ते २००४ या कार्यकाळात दादा दोन वेळा भाजपाचे आमदार म्हणून निवडून आले. खरे पाहिले तर स्व.पंडितांना मुंडे यांनी त्यांचे निकटवर्ती असलेले आर टी (जिजा) देशमुख यांच्या विरोधात जाऊन तुम्हाला मदत केली. पुढे आपण भाजपाला सोडले, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात गेलात. याच दरम्यान मुंडे घराण्यात फूट पडली. २००९ मध्ये झालेल्या नगरपालिकांच्या निवडणुकीमध्ये गोपीनाथ मुंडे आणि धनंजय मुंडे हे वेगवेगळे झाले. धनंजय मुंडे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात गेले आपणही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात गेलात पण २०१४ मध्ये तुम्ही माजलगावमधून पराभूत झाला. तिकडे धनंजय मुंडे देखील पराभूत झाले. पुढे २०१९ मध्ये तुम्हीही विजयी झालात धनंजय मुंडेही परळीतून विजयी झाले. त्यावेळी धनंजय मुंडे यांनी आपल्या विजयासाठी आपल्याच मतदारसंघात मोठ्या सभा घेतल्या होत्या, हे नाकारता येणार नाही. मुंडे कुटुंबीयामुळे आपल्याला गुलाल लागला हे विसरून कसे चालेल आणि मतदार देखील विसरणार नाहीत. आपण म्हणतात २०२४ च्या या निवडणुकीमध्ये परळीच्या मुंडे बहीण - भावांनी माझ्या पराभवासाठी षडयंत्र रचले. असो, यात तथ्यही असेल मात्र आपण आता का बोललात.? हा मोठा प्रश्न आहे. तुमच्या विजयासाठी धनंजय मुंडे यांनी माजलगाव शहर, डोंगर पट्ट्यामध्ये सभा घेतल्या त्याचा फायदा कोणाला झाला हे आपण विसरलात का.? असो, लोकसभा निवडणुकीमध्ये मतदार ऐकत नाहीत हे महायुतीचे नेतेच सांगत होते . सर्वाधिक लोकप्रतिनिधी महायुतीचे बीड जिल्ह्यात असताना देखील लोकसभेचा उमेदवार पराभूत कसा होतो याचेही आत्मचिंतन केले पाहिजे. त्या दोघांनी षढयंत्र रचले आपण म्हणतात, मग लोकसभेच्या उमेदवाराचा पराभव झाला त्यावेळी कोणी षढयंत्र रचले हे देखील आपण सांगितले पाहिजे. पंकजा मुंडे यांचा लोकसभेला पराभव झाला असला तरी त्यांनी मात्र कधीही कोणावर पराभवाचे खापर फोडले नाही. पराभव त्यांनी स्वीकारला मात्र आपणाला विजय पचवता आला नाही, हे तेवढेच सत्य आहे आणि अशीच चर्चा जिल्हाभर सुरू आहे.

---------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
मंगळवार, दि. १६ जून २०२६
३



## पिंपळनेर येथे प्रियंका परदेशी यांचा सत्कार

पिंपळनेर । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पिंपळनेर येथील श्री व्यंकटेश इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये दि. १३ जून रोजी पिंपळनेरच्या पहिल्या महिला पोलीस उपनिरीक्षक पदी नियुक्ती झालेल्या प्रियंका भरतसिंग परदेशी यांनी नाशिक येथील पोलीस प्रशिक्षण अकादमीत प्रशिक्षण पूर्ण केल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. सुरेश सावंत तर प्रमुख अतिथी म्हणून प्रियंका यांच्या आई इंदुबाई भरतसिंग परदेशी या होत्या. व्यासपीठावर प्राचार्य अशोक कदम यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सखाराम कानतोडे यांनी केले. त्याचबरोबर पीएसआय प्रियंका ताई यांनी आपले मनोगत विद्यार्थ्यांसमोर व्यक्त केले. त्यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांना अभ्यासाबद्दल प्रेरणादायी असे मार्गदर्शन केले. संयम, सातत्य, जिद्द, चिकाटी व परिश्रम याबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले. त्यानंतर प्रा. सावंत यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात पिंपळनेर नगरीच्या गुणवत्तेच्या इतिहासावर प्रकाश टाकला. शेवटी कार्यक्रमाचे आभार उप प्राचार्य तोगे यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य कदम, उपप्राचार्य तोगे, शिक्षक वृंद उदय खरात, सखाराम कानतोडे , मुकुंद आबूज , सागर कदम , पवार कैवल्या , दिव्या लोळगे, लांडे , राजश्री नरवडे , अंजली घुमरे तसेच संभाजी जाधव, प्रदीप आमटे, गणेश राऊत, अनिरुद्ध मोरे, पवन घुमरे, तुकाराम जाधव, विकास पूर्भे आदींनी परिश्रम घेतले.



संत खंडूजी बाबा विद्यालय सैदापूर आज आनंदमय वातावरणात शाळेच्या पहिल्याच दिवशी नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले यावेळी संस्थेचे अध्यक्ष सचिव व शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती भालेकर मॅडम शिक्षक कर्मचारी व पालक उपस्थित होते तसेच विद्यार्थ्यांना पुस्तकाचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांनी शाळेच्या निसर्गाच्या सानिध्यात जांभळ या फळाचा मनसोक्त आस्वाद घेतला.

## मिशन एड्स सुरक्षा काळाची गरज -डॉ.अन्सारी

माजलगाव । प्रतिनिधी

बीड जिल्हा एड्स नियंत्रण कक्ष, ग्रामीण रुग्णालय माजलगाव अंतर्गत आयसीटीसी विभाग व ग्रामीण विकास मंडळ बनसारोळा यांच्या संयुक्त विद्यमाने दि १५ जुन सोमवार रोजी मिशन एड्स सुरक्षा मौजे रोशन पुरी येथे कार्यक्रम घेण्यात आला. प्रथम रोषनपुरी येथील ग्रामसेवक नामदेव पाचपुते व गावातील ज्येष्ठ मंडळी यांनी सर्वप्रथम आरोग्य विभाग टीमचे




स्वागत केले त्यानंतर गावातील स्त्री-पुरुषांची आरोग्य तपासणी करण्यात आली मिशन एड्स सुरक्षा डॉक्टर अन्सारी मॅडम यांनी सविस्तर असे मार्गदर्शन केले समुपदेशक शेख शहाबुद्दीन यांनी एच आय व्ही एड्स कसा होतो त्याचे मूळ कारण सांगून प्रतिबंध कसा करता येईल यावर सर्व स्त्री-पुरुषांना समुपदेशन केले एच आय व्ही एड्स सुरक्षा संदर्भात सखोल चर्चा करण्यात आली एसटीडी,टी बी हे सिफिलिस. एचबीसी, इत्यादीची तपासणी करून घेण्याविषयी आव्हान करण्यात आले.आ इ सी वाटप करण्यात आले अंगणवाडी आशा वर्कर उपस्थित होत्या एल डब्ल्यू एस चे पाटील, घुगे मॅडम यांनी कार्यक्रमाला सहकार्य केले.

# ज्येष्ठ नागरिकांच्या अडचणीसाठी धावून येणार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण

बीड । प्रतिनिधी

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड व तहसील कार्यालय, बीड यांचे संयुक्त विदयमाने दिनांक १५ जून २०२६ रोजी सकाळी ठिक ११-३० वाजता प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश बीड तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण श्री.दिनेश पी.सुराणा यांचे मार्गदर्शनाखाली तहसील कार्यालय, बीड येथे ज्येष्ठ नागरिकांकरिता सुविधा केंद्राची स्थापना करण्यात आली.

सदर सुविधा केंद्राचे उदघाटन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव डॉ.वहाब ए.सयद यांचे शुभहस्ते करण्यात आले. सदर कार्यक्रमास अप्पर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक तहसीलदार चंद्रकांत शेळके, पीएलव्ही अशोक तांगडे व तत्वशील कांबळे, नायब तहसीलदार प्रशांत जाधवर, अण्णा जाधवर, महसुल सहाय्यक हेमलता परचाके, वैशाली बहिरवाळ व महेंद्र राउत, तर महसूल अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे उदघाटन कार्यक्रमास जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव डॉ.वहाब ए.सय्यद व अति.जिल्हाधिकारी हरिश धार्मिक यांचे हस्ते करण्यात आले.

सदर कार्यक्रमाचे उदघाटन प्रसंगी बोलताना डॉ.वहाब ए.सयद यांनी सांगितले की, नालसाच्या ज्येष्ठ नागरिकांकरिता कायदेशीर सेवा योजना २०१६ या नुसार वृध्द नागरिकांना कायदेशीर मदत, महसूल विभागाच्या संदर्भातील व इतर शासकीय मदतींची लाभ मिळण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण काम करत आहे. तसेच कायदेशीर हक्कांचे संरक्षण मिळण्याकरिता या ठिकाणी ज्येष्ठ नागरिक सुविधा केंद्राची स्थापना

न्याय सब के लिए
ACCESS TO JUSTICE FOR ALL
DISTRICT LEGAL SERVICES AUTHORITY

करण्यात आली आहे. या केंद्राचा लाभ सर्व गरजू व ज्येष्ठ नागरिकांनी घ्यावा असेही आवाहन त्यांनी या कार्यक्रमा प्रसंगी केले. तसेच त्यांनी ज्येष्ठ नागरिकांना ऑनलाईन फ्रॉड संदर्भात सतर्क राहण्याबाबत सांगितले. त्यांनी ज्येष्ठ नागरिकांना कोणालाही ओटीपी, आपल्या अंगठयाचा ठसा देवू नका असे आवाहन केले. सदर कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिकांकरिता वैदयकीय तपासणी कॅम्प आयोजित करण्यात आला होता. सदर वैदयकीय कॅम्पमध्ये डॉ.स्वप्ना घोळवे व डॉ.भिसे यांनी सदर केंद्राच्या माध्यमातून या ठिकाणी उपस्थित ज्येष्ठ नागरिकांची मोफत वैदयकीय तपासणी केली.सदर कार्यक्रमात बोलताना अति.जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी सांगितले की, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण ज्येष्ठ नागरिकांचे मुलभूत हक्क मिळण्यासाठी संपूर्ण जिल्हयामध्ये कार्यरत असून कोणत्याही ज्येष्ठ नागरिकांना कायदेशीर अडचण असल्यास जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्याशी संपर्क साधून आपली अडचण सोडवून घ्यावी. ज्येष्ठ नागरिकांच्या अडचणीकरिता जिल्हा विधी सेवा प्राधिकरण कार्यालय धावून येणार असून गरजूंनी याचा लाभ घ्यावा असेही आवाहन त्यांनी सर्व ज्येष्ठ नागरिकांना या कार्यक्रमा प्रसंगी केले.

यावेळी तत्वशिल कांबळे यांनी बोलताना सांगितले की, ज्येष्ठ नागरिकांच्या घरगुती अडचणी कायदेशीर अडचणी, आरोग्याच्या समस्या, निवासाच्या समस्या सोडविण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे विधीदूत कार्य करत आहेत. त्यामुळे ज्येष्ठांच्या अडचणीमध्ये मदत मिळते. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक नायब तहसीलदार जाधवर यांनी केले. तर आभार प्रदर्शन नायब तहसीलदार आण्णा वंजारे यांनी केले. सदर कार्यक्रमास जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे विधीदूत तत्वशिल कांबळे, अशोक तांगडे, मिथून जोगदंड, विधी महाविदयालयाचे इतर पीएलव्ही उपस्थित होते.

## शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हा परिषद माध्यमिक शाळा चौसाळा शाळेचे यश

चौसाळा । प्रतिनिधी

येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा शैक्षणिक उपक्रमाबरोबरच वेगवेगळ्या शिष्यवृत्ती परीक्षा मध्ये उल्लेखनीय कामगिरी करत असते त्यामध्ये इयत्ता पाचवी व आठवी चे विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र झाले आहेत , त्यामध्ये इयत्ता पाचवी तील शिष्यवृत्ती परीक्षेतील पात्र विद्यार्थी आदित्य कचरू कळसकर, चैत्राली अनिल चराटे, धनश्री ज्ञानेश्वर लोंढे, जानवी अशोक मस्के, राधिका अशोक जोगदंड, समर्थ गणेश विराम, यश नितीन हावळे, तर इयत्ता आठवीतील शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थी तनुजा बप्पाजी खाकरे, आदिती अतुल शिंदे, अनुष्का कैलास तोडकर, आरती उत्तरेश्वर हंगे, हे सर्व विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत पात्र विद्यार्थ्यांना यात इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांना पुढील दोन वर्ष पाच हजार रुपये प्रति वर्ष प्रमाणे शिष्यवृत्ती मिळणार आहे तर इयत्ता आठवीच्या



विद्यार्थ्यांना साडेसात हजार रुपये प्रति वर्ष प्रमाणे पुढील दोन वर्ष शिष्यवृत्ती मिळणार आहे चौसाळा येथील शाळा जिल्हा भरात विविध उपक्रमाने शाळेचे नावलौकिक करत असते, त्याचप्रमाणे शाळेने याही वर्षी शिष्यवृत्ती परीक्षेतील आपली शैक्षणिक परंपरा कायम राखली आहे शिष्यवृत्ती परीक्षा २२ फेब्रुवारी २०२६ रोजी घेण्यात आली होती या मध्ये शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांनच्या या यशाबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती पद्मजा हंपे, तंत्रस्नेही शिक्षक श्री संतोष परतापुरे, शालेय समितीचे अध्यक्ष विनोद शिंदे, उपाध्यक्ष श्रीमती जोगदंड सर्व सदस्य ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी श्रीम. प्रणिता गंगाखेडकर, केंद्रप्रमुख श्री सपाटे सर यांनी शाळेतील पाचवीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक श्री रामचंद्र भोसले, महारुद्र झोडगे, सुग्रीव तांदळे, श्रीमती शकुंतला तांबडे, तसेच आठवीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक श्री संतोष परतापुरे, वैभव शिंदे, ज्ञानेश्वर मस्के, उद्धव घोडके, योगानंद गांधले, श्रीमती शालिनी काकडे सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन व स्वागत केले.

पान ६ वरुन...

## आष्टी तालुक्यातील पाणीटंचाईवर

टँकर मंजूर करण्याची मागणी करण्यात आली.

सरपंच अशोक मुळे यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले की, कासारी-मुर्शदपूर परिसरात मोठ्या प्रमाणावर तरंगती लोकसंख्या वास्तव्यास असल्याने प्रत्यक्ष गरजेपेक्षा अधिक पाण्याची आवश्यकता भासते. मात्र शासनाच्या निकषांमुळे अतिरिक्त टँकर मंजुरीसाठी अनेक प्रशासकीय अडचणी निर्माण होत आहेत. तरीही गावातील कोणताही नागरिक पाण्यावाचून वंचित राहणार नाही यासाठी ग्रामपंचायत सातत्याने पाठपुरावा करत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.यावर गटविकास अधिकारी गोकुळ बागलाने यांनी सकारात्मक भूमिका घेत, प्राप्त झालेल्या प्रस्तावांची तातडीने पडताळणी करून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल तसेच नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरळीत राहण्यासाठी प्रशासन सर्वतोपरी प्रयत्न करेल, असे आश्वासन दिले.दरम्यान, आष्टी तालुक्यासह राज्यातील अनेक भागांवर दुष्काळाचे सावट गडद होत असल्याने प्रशासन सतर्क झाले आहे. पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर आष्टी मतदारसंघाचे आमदार सुरेश आण्णा धस यांनी नुकतीच तहसील कार्यालयात आढावा बैठक घेतली होती. यावेळी त्यांनी पाणीप्रश्नाचे गांभीर्य ओळखून सर्व नागरिकांनी पाणी बचतीचा संकल्प करावा, उपलब्ध जलस्रोतांचे संरक्षण करावे तसेच तलाव आणि बंधाऱ्यांमधील उपलब्ध पाणी आरक्षित ठेवण्याबाबत सिंचन विभागाच्या अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत.तालुक्यातील अनेक गावांमध्ये विहिरी, बोअरवेल आणि पारंपरिक जलस्रोतांची पाणीपातळी झपाट्याने घटत असल्याने येत्या काही महिन्यांत परिस्थिती आणखी बिकट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे प्रशासनाने टँकर मंजुरीची प्रक्रिया गतीमान करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

## २५ लाखांचा निधी : खर्च

समाजाची वस्ती आहे. शेतकरी, शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, दूध उत्पादक व सर्वसामान्य नागरिकांसाठी हा रस्ता आष्टी शहराशी जोडणारा प्रमुख मार्ग आहे.ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, रस्त्याचे काम अर्धवट सोडून संबंधित ठेकेदाराने ४.५० लाखांचे देयक उचलले. मात्र प्रत्यक्षात कोणतेही समाधानकारक काम झालेले दिसून येत नाही. त्यामुळे संबंधित ठेकेदारास नोटीस बजावून कामाची चौकशी करावी आणि रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. प्रशासनाने तात्काळ दखल न घेतल्यास या भागातील नागरिक आमरण उपोषण छेडतील, असा इशाराही देण्यात आला आहे. रस्त्याची सद्यस्थिती पाहता नागरिकांचा सवाल - काम कुठे झाले आणि पैसा गेला कोठे.

## ना. पंकजाताईंच्या पाठिंब्यावर

प्रकाश सोळंके यांनी बाबरी मुंडे यांना आपल्या पक्षात प्रवेश देत जाहीर सभेत ''बाबरीला मीच उभा केले होते,'' अशी कबुली दिली होती, असा दावा करण्यात आला. वारंवार बिनबुडाचे आरोप करून आमदार प्रकाश सोळंके नेमके काय साध्य करू इच्छितात? मराठा आणि ओबीसी समाजात वाद निर्माण करून राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न सुरू आहे का? यामागे काही षडयंत्र आहे का? याची उत्तरे त्यांनी जनतेसमोर द्यावीत, अशी मागणी यावेळी करण्यात आली. या पत्रकार परिषदेला भाजप प्रदेश सदस्य अरुण राऊत, माजी नगराध्यक्ष डॉ. अशोक तिडके, भाजप नेते ज्ञानेश्वर मेंडके, तालुका मंडल अध्यक्षा रुपाली कचरे, शहराध्यक्ष विनायक रत्नपारखी, डॉ. प्रशांत पाटील, भाजप नेते ज्ञानेश्वर सरवदे, प्रदीप जाधवर, सतीश जोशी, सुभाष साळवे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## शाळेच्या पहिल्याच दिवशी

पाऊस होईपर्यंत किमान चार ते आठ दिवस संयम ठेवावा आणि हवामानाचा अंदाज लक्षात घेऊनच पेरणीचा निर्णय घ्यावा , असे त्यांनी सांगितले. शेतकरी बांधवांशी संवाद साधताना त्यांनी प्रत्यक्ष औत हाती घेत शेतातील पाळीचे काही मोड घातले . प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी शेतकऱ्यांच्या शेतात उतरून त्यांच्या कामात सहभागी झाल्याने उपस्थित शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले . शेतकरी आणि प्रशासन यांच्यातील विश्वास अधिक दृढ करणारा हा प्रसंग ठरला.जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनीही वेळोवेळी शेतकऱ्यांनी हवामानातील बदल लक्षात घेऊन वैज्ञानिक शेतीचा अवलंब करावा , असे आवाहन केले असून अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी खरीप हंगामात महसूल व कृषी यंत्रणा शेतकऱ्यांच्या मदतीसाठी सज्ज असल्याचे स्पष्ट केले आहे . उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनीदेखील पेरणीपूर्व नियोजन , जलसंधारण आणि जोखीम व्यवस्थापनावर भर देण्याचे मार्गदर्शन केले आहे . या पार्श्वभूमीवर तहसीलदार शेळके यांची जरूड येथील भेट महत्त्वपूर्ण मानली जात आहे. यावेळी जरूडचे सरपंच श्रीराम काकडे , उपसरपंच पंजाब काकडे , ज्येष्ठ शेतकरी भगवान काकडे , कल्याण काकडे , लक्ष्मण काकडे , रामनाथ काकडे , महादेव काकडे , आप्पाराव काकडे , विनोद कोरडे तसेच परिसरातील अनेक शेतकरी उपस्थित होते . उपस्थित शेतकऱ्यांनी शेतीविषयक विविध प्रश्न मांडले असून त्यावर सकारात्मक चर्चा करण्यात आली.

## कवडगाव ग्रामपंचायतीकडून

स्वच्छतागृह व फिल्टर पाण्याची व्यवस्था केली आहे. विद्यार्थ्यांचे आरोग्य व शारीरिक विकास लक्षात घेऊन शाळेत खेळणी साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. तसेच गावातील अंगणवाडी इमारत सुसज्ज करण्यात आली असून, लहान मुलांसाठी चांगले वातावरण निर्माण करण्यात आले आहे. वार्ड क्रमांक चारमधील रस्त्याचे काम लवकरच सुरू करण्यात येणार असल्याची माहितीही सरपंचांनी दिली. घरकुल योजनेचा लाभ गावातील पात्र लाभार्थ्यांना मिळावा यासाठी पी.टी.आर. सह

आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून देण्याचे काम ग्रामपंचायतीमार्फत करण्यात येत आहे. याशिवाय गावात नागरिकांच्या गरजेनुसार अनेक विकासकामे राबविण्यात आली आहेत. यावेळी सरपंच शेख बशीरभाई म्हणाले की, गावाचा विकास हा सर्वांच्या सहकार्यानेच शक्य आहे. येणाऱ्या काळात गावात ज्या सुविधा उपलब्ध करून देणे बाकी आहेत, त्या देखील प्राधान्याने पूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न राहील. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून सुरू असलेल्या विकासकामांमुळे ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण असून, नागरिकांकडून सरपंच शेख बशीरभाई यांच्या कामाचे कौतुक केले जात आहे.

चौकट-कवडगाव येथे सर्व सोयी सुविधा उपलब्ध असलेले प्राथमिक आरोग्य केंद्र आणण्यासाठी प्रयत्न करणार. युवकांसाठी सुसज्ज अशी व्यायाम शाळा उभारण्यासाठी प्रयत्न करणार तसेच गावातील रस्ते नाल्यासह रखडलेल्या सर्व कामे मार्गी लावण्यासाठी ताकदीने प्रयत्न करणार

(सोनवणे सतीश अभिमन्यू.) ग्रामपंचायत सदस्य कवडगाव

## प्रियदर्शनी प्राथमिक शाळेमध्ये प्रथम दिनाचा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा

पाटोदा । प्रतिनिधी

शहरात असणाऱ्या इयत्ता पहिली ते चौथीच्या प्रियदर्शनी प्राथमिक शाळेमध्ये संस्थेचे सचिव योगेश भैय्या क्षीरसागर तथा गटनेत्या सारिका ताई शिरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली व मुख्याध्यापक मोरे सर, विभाग प्रमुख सौ वीर मॅडम तथा सहशिक्षक माताडे सर व श्रीमती शेलार मॅडम यांच्या नियोजनातून शाळेचे शैक्षणिक वर्ष २०२६ २७ या शैक्षणिक प्रवेशोत्सवाची सुरुवात आज प्रथम दिनी शाळेत दाखल झालेल्या नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत सत्कार करून करण्यात आली यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संत बाळूदेव विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री



बोखारे सर व पाटोदा पंचायत समितीचे माजी सभापती अनिल जायभाय सर हे उपस्थित होते तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे श्रीकांत लांडगे पालक वर्गातून श्री गणेश रावजी खाडे श्री महादेव मार्कड हे यावेळी उपस्थित होते.. प्रथम शाळेत नवीन दाखल झालेल्या विद्यार्थ्याचे ऑप्शन करून पुष्पहार तथा पुस्तक देऊन त्याचे स्वागत करण्यात आले यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना प्रमुख पाहुण्यांनी पाटोदा शहरांमध्ये अत्यंत दर्जेदार असणारी प्राथमिक शिक्षण देणारी ही शाळा आहे असा उल्लेख केला .. शेवटी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

## सरकार विरोधात मातंग क्रांती मोर्चा -राजेश घोडे

माजलगाव । प्रतिनिधी

दिनांक १६ जून मंगळवार रोजी सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स येथून मोर्चा सकाळी ११:०० वाजता निघणार असून तो जिल्हाधिकारी कार्यालय बीड यांच्यावर धडकणार आहे मातंग क्रांती मोर्चा दणक्यात निघणार असल्याचे पत्रक आझाद क्रांती सेना प्रमुख राजेश घोडे यांनी काढले आहे

दि ०१ऑगस्ट २०२४ रोजी सुप्रीम कोर्टाने सब क्लासिफिकेशन चा निर्णय देऊन संपूर्ण देशामध्ये राखीव एस सी. कोठ्यामध्ये कोठा निर्माण करण्यास परवानगी असल्याचे म्हटले आहे राज्याने त्यांना गरज भासल्यास तशी परवानगी आहे असा महत्वपूर्ण



निर्णय देऊन वंचितातील वंचिताला न्याय मिळण्याचा मार्ग सुकर केला गेला आहे देशातील पाच राज्यात क्लासिफिकेशन झालेले असताना महाराष्ट्रातील भाजपा सरकार मात्र जाणीवपूर्वक मातंग समाजावर अन्याय करण्याच्या भूमिकेत असल्यानेच संपूर्ण महाराष्ट्रामध्ये मातंग समाजाचा आक्रोश या सरकारच्या विरोधामध्ये निर्माण झाला आहे त्यामुळेच संपूर्ण महाराष्ट्र मध्ये मोर्चे निघत आहेत त्याचाच एक भाग म्हणून १६ जून मंगळवार रोजी सरकारचं लक्ष वेधण्यासाठी भाजपा सरकार विरोधामध्ये बीड येथे मातंग क्रांती मोर्चा च्या माध्यमातून या सरकारला जाब विचारण्यासाठी बहुसंख्याने समाज रस्त्यावरती उतरणार आहे. तेव्हा सरकारने तात्काळ उपवर्गीकरण लागू करावं यासाठी प्रचंड असा आक्रोश रस्त्यावरती दिसणार आहे.या सरकारने तात्काळ निर्णय न घेतल्यास येणाऱ्या काळात भाजप सरकारला त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागणार असल्याचे मत आझाद क्रांती सेना प्रमुख राजेश घोडे यांनी व्यक्त केले आहे.

# आष्टीत मंगळवारपासुन माऊली नगरामध्ये धाकट्या पंढरीचे स्वरूप येणार माऊलींच्या सप्ताहास प्रारंभ

आष्टी । प्रतिनिधी

विसाव्या शतकातील महान विभूती संत प.पू.ब्र.भु. ज्ञानेश्वर माऊली चाकरवाडीकर यांचा २६ वा. पुण्यतिथी सोहळ्या निमित्त ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, संगीत श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ व भव्य अखंड हरिनाम सप्ताह भव्य अखंड हरिनाम सप्ताह सोहळा दि. २३ ते ३० जुन या कालावधीत होत आहे. ज्ञानेश्वरी मुखोद्गत असलेले, रामायणाचार्य, भागवताचार्य ह.भ.प. भागवत महाराज बादाडे यांची संगीत सुश्राव्य संगीत श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ होणार आहे. ह.भ.प. आदिनाथ महाराज दानवे यांच्या हस्ते कलश पुजन, विनापूजन ह.भ.प. रामदास महाराज डोरले, ग्रंथपूजन- ह.भ.प. श्रीहरी पुरी महाराज, दिपप्रज्वलन ह.भ.प. ब्रम्हचैतन्य तावरे महाराज, ह.भ.प. मंगेशदेवा जोशी, ह.भ.प. धोंडीबापु वांढरे, ह.भ.प. अशोक डोके सर, ह.भ.प. घनश्याम खलासे महाराज, ह.भ.प.गोविंद पवार सर, ह.भ.प. सोनाजी बनकर सर यांच्या हस्ते होणार आहे. सप्ताहात विष्णूसहस्रनाम व गीतापाठ- ह.भ.प.निवृत्ती महाराज बोडखे, ज्ञानेश्वरी व्यासपीठ चालक ज्ञानेश्वरी कंठस्य ह.भ.प. बालाजी महाराज कवठेकर, मृदंगाचार्य मृदंग विशारद ह.भ.प. ओम महाराज नन्नवरे, ह.भ.प. औदुंबर आवारे तर गायनाचार्य ह.भ.प. अनिल महाराज गरूड,

ह.भ.प. बबन महाराज बळे, ह.भ.प. देविदास महाराज बरडे, ह.भ.प. रविंद्र महाराज तवले, ह.भ.प.दत्ता महाराज खाडे, ह.भ.प. मुकेश महाराज तळेकर, ह.भ.प. ब्रह्मचैतन्य महाराज तावरे, काकडा भजन ह.भ.प. रावसाहेब महाराज आडसरे, ह.भ.प. गोपीनाथ महाराज पोकळे, ह.भ.प. भानुदास पारस कोकणे, ह.भ.प. मच्छिंद्र महाराज करडुळे, ह.भ.प. नानासाहेब महाराज तवले, ह.भ.प. शामराव झांबरे महाराज, ह.भ.प. बबन महाराज जगताप, हार्मोनियम ह.भ.प. उत्तम महाराज पोकळे, ह.भ.प. किसन महाराज जगताप यांची साथसंगत लाभणार आहे. या धार्मिक कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहुन ज्ञानामृत सेवन करावे असे आवाहन माऊली सेवा मंडळाने केले आहे. २० व्या. शतकातील महान संत ज्ञानेश्वर माऊली चाकरवाडीकर यांचे २६ व्या. पुण्यतिथीनिमित्त सोहळ्या निमित्त अ.भा. वारकरी मंडळाचे प्रेरणाने ज्ञानेश्वरी पारायण, अखंड हरिनाम सप्ताह व संगीत श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा आष्टी शहरातील माऊली नगरातील माऊली मंदिर आवारात सुरु होत आहे. संत ज्ञानेश्वर माऊली चाकरवाडीकर यांच्या २६ व्या. पुण्यतिथीनिमित्त भागवताचार्य ह.भ.प. भागवत महाराज बादाडे यांची संगीत भागवत कथा दि.२३ ते २९ जुन २०२६ या कालावधीत दुपारी २ ते ५ यावेळात होणार आहे अशीही माहिती माऊली सेवा मंडळाने दिली.

### हभप भागवत महाराज बादाडे यांची श्रीमद भागवत कथा

या सप्ताहात काकडा भजन, विष्णु सहस्रनाम, गीतापाठ, पसायदान, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, दररोज दुपारी २ ते ५ संगीत श्रीमद् भागवत कथा, सायंकाळी हरिपाठ, रात्री ७ ते ९ हरिकीर्तन नंतर भोजन आदि धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल होणार आहे. मंगळवार दि. २३ जुन रोजी नामधारक ह.भ.प. संत आसाराम महाराज केळसांगवीकर यांचे नामसंकीर्तन, बुधवार दि. २४ जुन रोजी ह.भ.प. पांडुरंग महाराज मुंडे, गुरुवार २५ जुन रोजी ह.भ.प. समाधान महाराज, शुक्रवार २६ जुन रोजी ह.भ.प. डॉ. जलाल महाराज सय्यद, शनिवार २७ जून रोजी भागवताचार्य भागवत महाराज बादाडे तर रविवार २८ जुन रोजी ह.भ.प. वैराग्यमूर्ती रामकृष्ण रंधवेबापु महाराज, सोमवार २९ जुन रोजी सकाळी १० ते १२ यावेळात पुण्यकालाचे कीर्तन हिंदू भूषण ह.भ.प.सुनीताताई आंधळे महाराज (आळंदी) यांचे तर रात्री ७ ते ९ यावेळात अखिल भारतीय वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष ह.भ.प. प्रकाश महाराज बोधले यांचे कीर्तन होणार आहे. श्रीमद् भागवत कथा विश्राम पावल्यानंतर ज्ञानेश्वरी, अभंगगाथा, श्रीमद भागवत, गुरुवर्य संत ज्ञानेश्वर माऊली चाकरवाडीकर महाराजांच्या प्रतिमेची टाळमृदंग, ढोललेझीम व बॅण्डपथकासह भव्य मिरवणूक होणार आहे. मंगळवार ३० जून रोजी सकाळी ८ ते १० यावेळात संगीत विशारद ह.भ.प. आदिनाथ औटे सर आणि माऊली सेवा भजनी मंडळ यांचे संगीत भजन होणार आहे. मंगळवारी सकाळी १० ते १२ यावेळात श्री संत ज्ञानेश्वर माऊली चाकरवाडीकर यांचे उत्तराधिकारी, तपोनिधी ह.भ.प. महादेव महाराज चाकरवाडीकर यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. त्यानंतर महाप्रसाद वाटप होणार आहे. सात दिवस सुरू राहणाऱ्या सत्ता आणि माऊली नगरामध्ये अक्षरशा दात्या पंढरीचे स्वरूप येते भल्या पहाटेपासून काकड आरती ते संध्याकाळचे कीर्तन भजनाच्या जय घोषाने माऊली नगर दुमदुमून जाते.

# राज्यात कापूस उत्पादकता वाढविण्यासाठी महाअभियान

## १९ जिल्ह्यांत अंमलबजावणी सुरू

पुणे / प्रतिनिधी

राज्यातील १९ कापूस उत्पादक जिल्ह्यांत २०२६-२७ ते २०३०-३१ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या कापूस उत्पादकता अभियानाच्या अंमलबजावणीला कृषी विभागाने प्रारंभ केला आहे. अभियानाच्या अंमलबजावणीसाठी विभागीय कृषी सहसंचालक व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांना मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत.

मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, नांदेड, परभणी आणि हिंगोली या जिल्ह्यांसह धुळे, नंदुरबार, जळगाव, अहिल्यानगर, बुलडाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये हे अभियान राबविले जाणार आहे. केंद्र शासनाच्या धनधान्य कृषी योजनेअंतर्गत या अभियानाची अंमलबजावणी होणार असून २०२६-२७ या वर्षासाठी मंजूर वार्षिक कृती आराखड्यानुसार विविध उपक्रम राबविले जातील. पालघर व रायगड जिल्ह्यांत कपाशीचे क्षेत्र नसल्याने त्यांचा अभियानात



समावेश करण्यात आलेला नाही. आवश्यकता भासल्यास अन्य जिल्ह्यांचाही समावेश करता येणार आहे. अभियानांतर्गत पीक प्रात्यक्षिके, क्लोज स्पेसिंग प्रात्यक्षिके, एकात्मिक पीक व्यवस्थापन, शेतकरी प्रशिक्षण तसेच स्थानिक गरजांनुसार विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. अभियानासाठी केंद्र शासनाचा ६० टक्के आणि राज्य शासनाचा ४० टक्के निधी उपलब्ध होणार आहे. राज्य शासनाने २ जून २०२६ रोजी काढलेल्या शासन निर्णयानुसार अभियानासाठी १९१ कोटी ८२ लाख रुपयांच्या वार्षिक कृती आराखड्यास मान्यता दिली आहे. यासंदर्भातील भौतिक व आर्थिक कार्यक्रम तातडीने राबविण्याच्या सूचना राज्याचे कृषी संचालक (विस्तार व प्रशिक्षण) र. शा. नाईकवाडी यांनी सर्व विभागीय कृषी सहसंचालक आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. अभियानात सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांना महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करता येणार असल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.कापूस हे देशातील महत्त्वाचे नगदी पीक असून राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत त्याचे विशेष स्थान आहे. हे लक्षात घेऊन राज्याने कापूस उत्पादकता वाढविण्याचा महत्त्वाकांक्षी आराखडा तयार केला आहे. या अभियानाद्वारे २०३०-३१ पर्यंत राज्यातील कापूस उत्पादन १२५ लाख गाठी आणि हेक्टरी रुई उत्पादन ५५० किलोपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८५८ : अठराशे सत्तावनच्या संग्रामातील मोरारची लढाई
१९०३ : फोर्ड मोटर कंपनीची स्थापना.
१९११ : एन्डिकोट, न्यूयॉर्क येथे द कॉम्प्युटिंग टॅब्युलेटिंग अँड रेकॉर्डिंग कंपनीची स्थापना झाली. याच कंपनीचे पुढे आय. बी. एम. या बलाढ्य कंपनीत रुपांतर झाले.
१९१४ : सहा वर्षांच्या तुरुंगवासातून लोकमान्य टिळक यांची सुटका
१९४७ : नव्या, कल्पक उद्योजकांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने म. स. तथा 'बाबुराव' पारखे यांनी मराठा चेंबरच्या वतीने कै. गो. स. पारखे औद्योगिक पारितोषिक देण्यास सुरुवात केली.
१९६३ : व्हॅलेन्तिना तेरेश्कोवा या रशियन महिलेने वोस्तोक ६ या यानातून अंतराळप्रवास करुन जगातील पहिला अंतराळ वीरांगना होण्याचा मान मिळवला.
१९९० : मुंबई व उपनगरात दिवसभरातील सर्वाधिक वृष्टी झाली. गेल्या १०४ वर्षातील जूनमधे एका दिवसात पडलेल्या पावसाचा (६००.४२ मि.मि.) उच्चांक गाठला गेला.
२०१० : तंबाखूवर पूर्णपणे बंदी करणारा भूतान हा जगातील पहिला देश बनला.


### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७२३ : अॅडम स्मिथ स्कॉटिश अर्थशास्त्रज्ञ आणि तत्त्ववेत्ता (मृत्यू: १७ जुलै १७९०)
१९२० : हेमंत कुमार मुखोपाध्याय, प्रसिद्ध गायक, संगीतकार.
१९३६ : अखलाक मुहम्मद खान उर्फ कवी शहरयार ज्ञानपीठ पुरस्कार विजेते ऊर्दू कवी (मृत्यू: १३ फेब्रुवारी २०१२)
१९५० : भारतीय अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांचा जन्म.
१९६८ : अरविंद केजरीवाल 'आम आदमी पार्टी'चे संस्थापक, समाजसेवक व सनदी अधिकारी
१९९४ : आर्या आंबेकर, प्रसिद्ध गायिका.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८६९ : भारतीय-इंग्रजी वनस्पतीशास्त्रज्ञ व संशोधक चार्ल्स स्टर्ट यांचे निधन. (जन्म: २८ एप्रिल १७९५)
१९२५ : बंगालमधील विख्यात कायदेपंडित आणि स्वातंत्र्यसेनानी देशबंधू चित्तरंजन दास यांचे निधन. (जन्म: ५ नोव्हेंबर १८७०)
१९३० : गॅरोकोम्पास चे सहसंशोधक एल्मर अॅम्ब्रोज स्पीरी यांचे निधन. (जन्म: १२ ऑगस्ट १८६०)
१९४४ : आचार्य प्रफुल्लचंद्र रे भारतीय रसायनशास्त्रज्ञ, देशातील वैज्ञानिक चळवळीचे प्रणेते, त्यांनी 'बेंगॉल केमिकल्स अँड फार्मास्युटिकल्स' ही कंपनी काढली. १८९६ मधे त्यांनी पारा आणि नायट्रोजन यांच्या संयोग करुन मर्क्युरस नायट्रेटची निर्मिती केली. त्यांना 'मास्टर ऑफ नायट्रेटस' म्हणत असत. (जन्म: २ ऑगस्ट १८६१)
१९७१ : बीबीसी चे सह-संस्थापक जॉन रीथ यांचे निधन. (जन्म: २० जुलै १८८९)
१९७७ : श्रीपाद गोविंद नेवरेकर, मराठी रंगभुमीवरील लोकप्रिय गायक, नट.
१९९५ : शुद्धमती तथा 'माई' मंगेशकर मंगेशकरांच्या मातोश्री

# 'प्लायमाउथ रॉक' कोंबडी पाळल्यास कमी खर्चात अधिक नफा!



शेतकरी जोड व्यवसाय म्हणून अनेक व्यवसाय करत उत्पन्न घेत असतात. या कृषिपूरक व्यवसायांपैकी कुक्कुटपालन व्यवसाय शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरत आहे. यातून शेतकरी वर्ग कमी खर्चात अधिक उत्पन्न काढू शकतो. ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात घरोघरी केला जाणारा व्यवसाय म्हणजे कुक्कुटपालन. कुक्कुटपालन करून शेतकरी अंडी, आणि मांस उत्पादन करण्याचा व्यवसाय करून चांगले उत्पन्न घेऊ शकतात. कुक्कुटपालन व्यवसाय अगदी कमी पैशातही सुरू करू शकणारा व्यवसाय आहे.

बरेचदा कुक्कुट पालकांना समजत नाही की त्यांनी कोणत्या जातीची कोंबडी पाळावी.

वर्षाला २५० अंडी :आपण ज्या कोंबडीबद्दल बोलत आहोत त्या कोंबडीचे नाव आहे 'प्लायमाउथ रॉक' कोंबडी. ही कोंबडी एका वर्षात २५० पर्यंत अंडी घालू शकतात, त्यामुळे शेतकर्यांना बंपर नफा मिळवून देऊ शकते. या कोंबडीच्या एका अंड्याचे सरासरी वजन ६० ग्रॅम पर्यंत असते. 'प्लायमाउथ रॉक' कोंबडीची वैशिष्ट्ये :या कोंबडीचे वजन ३ किलोपर्यंत असते. या कोंबडीचे कान लाल असतात, तर चोच पिवळी असते.ही कोंबडीची अमेरिकन जात मानली जाते. तरीही भारतातील अनेक राज्यांमध्ये ते मुबलक प्रमाणात आढळते. व्यवसायाच्या दृष्टीने, कोंबडीची ही जात भारतात खूप चांगली मानली जाते. प्लायमाउथ रॉक चिकन भारतातील प्रत्येक राज्यात आढळते. या कोंबडीला 'रॉक बॅरेड रॉक'या नावाने सुद्धा ओळखले जाते. या कोंबडीचे मांस देखील अतिशय चवदार आणि आरोग्याच्या दृष्टीने फायदेशीर मानले जाते. त्यामुळेच त्याच्या मांसाची किंमत बाजारात जास्त असते. शेतकरी बंधुंनो तुम्ही सुद्धा कोंबडी पालन व्यवसाय करू इच्छित असाल किंवा नवीन प्रजातीची कोंबडी पालन करणार असाल तर 'प्लायमाउथ रॉक' कोंबडी एक चांगला पर्याय आहे.

# निंबोळी पावडर पिकांसाठी उपयुक्त, होते पिकाचे संरक्षण


सेंद्रिय,रेसिड्यू फ्री, नैसर्गिक, जैविक, एकात्मिक व रासायनिक अशा सर्व शेती प्रकारांमध्ये वापरण्यात येणाऱ्या निंबोळी पावडरचे अनेक फायदे असून वापरण्यास सुरक्षित असे आहे. सध्या रासायनिक निविष्ठांचा सुयोग्य पर्याय म्हणून निंबोळी पावडरचा मोठ्या प्रमाणात शेतकरी वापर करत आहेत.

निंबोळी पावडर चे फायदे : निंबोळी पावडर मध्ये ऑझाडिरेक्टींन घटक असल्यामुळे मातीमधील होमनी, खोडकीड, कटवर्म, वाळवी विषाणू बुरशी या रोगकिटका रोगांचा ते नायनाट करते. निंबोळी पावडर हे संपूर्ण नैसर्गिक स्वरूपा मधील निंबोळी पावडर असल्याने जमिनीमधील कोणत्याही उपयुक्त जिवाणूंना हानी पोहोचत नाही. निंबोळी पावडर हे रासायनिक खतांमध्ये मिसळून वापरल्याने रासायनिक खतांची मधील नत्र टिकून राहते. निंबोळी पावडर पिकांचे सूक्ष्म कुरमी च्या , सूत्रकृमीच्या प्रादुर्भावावर १००% संरक्षण करते. निंबोळी पावडर महारोगाच्या प्रमाणामध्ये घट करते. निंबोळी पावडर च्या वापरामुळे जमिनी मधील मातेचे कण एकमेकांना चिटकत नाहीत. यामुळे जमिनीमध्ये हवा खेळती राहते. निंबोळी पावडर जमिनीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढवते. तसेच माती मधील ह्युमन चे प्रमाण वाढवून पिकांच्या पांढऱ्या मुळांची वाढ होण्यास मदत होते. निंबोळी पावडरच्या वापरामुळे जमिनीचा सामू चांगला राखला जातो. परिणामी उत्पादन व गुणवत्ता वाढते.

निंबोळी पावडरच्या वापराचे प्रमाण : सर्व पिकांमध्ये वापरास योग्य असणारी हे निंबोळी पावडर एकरी १५० किलो ग्रॅम वापरण्याची शिफारस आहे.फळबागा मध्ये वापर करायचा असल्यास २०० ग्रॅम प्रति झाड (१ वर्ष ) याप्रमाणे यामध्ये चांगले कुजलेले शेणखत द्यावे. सेंद्रिय, रेसिड्यूफ्री, नैसर्गिक, जैविक, एकात्मिक, रासायनिक इ. सर्व शेती प्रकारांमध्ये वापराकरता पूर्ण सुरक्षित आहे.



# शेळ्या सारख्या आजारी पडत असल्यास 'या' झाडांची पाने खाऊ घाला, रोग बरे करा!



बहुतेक वेळा तुमच्या बघण्यात आले असेल की शेळ्या बाहेर चरायला गेल्यावर काही विशिष्ट झाडांचा किंवा वनस्पतीचा पाला खातात. शेळ्या आजारी पडल्या तर ते स्वतःला बरे करण्यासाठी झाडे किंवा वनस्पतींची पाने खातात. परंतु सध्या बहुतेक शेळीपालक शेळ्यांना बाहेर चरायला नेत नाही किंवा त्यांना शेळीपालन व्यवसायासाठी पुरेशी जागा सुद्धा नसते. अशा परिस्थितीत शेळ्यांना वेळोवेळी खाण्यासाठी अशा उपयुक्त झाडाची पाने द्यावीत. शेळ्यांना वेळोवेळी खाण्यासाठी झाडाची पाने द्यावीत. मोरिंगा, कडुनिंब, जामुन, बाईल आणि पेरूची पाने दिल्यास शेळ्यांना जास्त फायदा होईल. ही पाने शेळ्यांना अनेक रोगांपासून दूर ठेवतील.

हिरवा चारा हा दुभत्या जनावरांसाठी जीवनरक्षकापेक्षा कमी नाही. गाई, म्हशींबरोबरच शेळयांसाठीही हिरवे गवत आवश्यक असल्याचे जाणकार सांगतात. कारण त्यात अनेक औषधी औषधांचे गुणधर्म आढळतात. हे खाल्ल्यानंतर जनावरांची दूध देण्याची क्षमता वाढते. परंतु शेळयांसाठी गवतापेक्षा झाडांची पाने आणि वनस्पती अधिक फायदेशीर आहेत. पानांमध्ये असे घटक आणि औषधी गुणधर्म आढळतात, जे सेवन केल्याने शेळ्यांचे अनेक रोग आपोआप बरे होतात. कारण झाडांची पाने शेळ्यांसाठी औषध म्हणून काम करतात.

पानांमध्ये टॅनिन आणि प्रथिने आढळतात : वास्तविक, मोरिंगा म्हणजेच शेवग्याची पाने, कडुनिंब, जामुन, आणि पेरूच्या पानांमध्ये मुबलक प्रमाणात टॅनिन सामग्री आणि प्रथिने आढळतात, जे शेळ्यांसाठी खूप उपयुक्त आहेत. त्यांची पाने खाल्ल्याने शेळ्यांच्या पोटात जंत होत नाहीत. त्यामुळे शेळ्यांची वाढ झपाट्याने होते. त्यांचे वजनही झपाट्याने वाढते. शेळ्यांच्या पोटात जंत आल्यावर अनेक प्रकारचे आजार आपोआप उद्भवतात, असे तज्ज्ञ सांगतात. त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो.

शेळ्यांच्या मृत्यूचे प्रमाण कमी होते :कडुनिंब, पेरू, जामुन, मोरिंगा ही झाडे तुम्हाला सर्वत्र सहजासहजी दिसणार नाहीत. तरीही तुम्हाला काळजी करण्याची गरज नाही. सीआयआरजी अशा पानांपासून बनवलेले औषध बाजारात विकत आहे. ते खाल्ल्यानंतर फायदा होईल. त्याचबरोबर शेळीच्या करडांना कडुनिंबाची पाने खाऊ घातल्यास त्यांच्या शरीरातील रोगांशी लढण्याची शक्ती वाढते. हे खाल्ल्याने शेळीची करडे सहजासहजी आजारी पडत नाहीत. त्याचबरोबर शेळ्यांच्या मृत्यूचे प्रमाणही कमी होते. शेळीपालनातही सर्वाधिक नुकसान शेळ्यांच्या मृत्यूमुळे होते.

# मका, बाजरी, चवळी जनावरांच्या चाऱ्यासाठी सकस

जनावरांची निरोगी वाढ व प्रजनन क्षमता टिकविण्यासाठी हिरवा चारा आवश्यक आहे. हिरवा चारा चवदार व पाचक असल्याने आहारातील महत्त्वाचे घटक नैसर्गिक स्वरूपात उपलब्ध झाल्याने जनावराचे शरीराच्या कोणत्याही अवयवावर ताण न येता पचन होते व तापमान नियंत्रित राहण्यास मदत होते.

मका : मका हे जलद वाढणारे, पालेदार, सकस, रुचकर, अधिक उत्पादनक्षम, पौष्टिक तसेच भरपूर शर्करायुक्त पदार्थ असणारे चारा पीक आहे. या चाऱ्यापासून उत्तम दर्जाचा मुरघास तयार करता येतो. हिरव्या चाऱ्यात ९ ते ११ टक्के प्रथिनांचे प्रमाण असते. लागवडीसाठी जमीन सुपीक, कसदार व निचरायुक्त निवडावी. एक नांगरट व कुळवाच्या दोन ते तीन पाळ्या देऊन जमीन भुसभुशीत करावी. पूर्वमशागतीच्या वेळी जमिनीत हेक्टरी ५ टन शेणखत द्यावे. आफ्रिकन टॉल, मांजरी कंपोझिट, गंगा सफेद-२, विजय या जातींची निवड करावी. पेरणीसाठी हेक्टरी ७५ किलो बियाणे लागते. पेरणीपूर्वी प्रति दहा किलो बियाण्यास २५० ग्रॅम अॅझोटोबॅक्टर या जिवाणू संवर्धकाची बीज प्रकिया करावी. जून-जुलै महिन्यांत पाभरीने ३० सेंमी अंतरावर पेरणी करावी. प्रति हेक्टरी १०० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश द्यावे. यापैकी ५० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश पेरणीच्यावेळी व उर्वरित ५० किलो नत्राचा दुसरा हप्ता पेरणीनंतर एक महिन्याने द्यावा. कापणी साधारणपणे पन्नास टक्के पीक फुलोऱ्यात (पेरणीनंतर ६५ ते ७० दिवसांनी) असताना करावी. हिरव्या चाऱ्याचे प्रति हेक्टरी ५०० ते ६०० क्विंटल उत्पादन मिळते.



ज्वारी : अवर्षणप्रवण भागात व हलक्या जमिनीत देखील तग धरून राहण्याची क्षमता असल्याने निश्चित चारा उत्पादन देणारे पीक आहे. चाऱ्याकरिता विकसित केलेले वाण सुमारे ३ ते ४ मीटर उंच वाढतात. त्याची ताटे हिरवीगार, पालेदार, रसाळ, रुचकर व पौष्टिक असल्यामुळे जनावरे ती आवडीने खातात. ज्वारीच्या चाऱ्यात ८ ते १० टक्के प्रथिने असतात. चारा पिकासाठी मध्यम ते भारी व चांगली निचरा होणारी जमीन लागते. पूर्वमशागतीच्या वेळी हेक्टरी ५ टन भरखत म्हणून शेणखत किंवा कंपोस्ट खत जमिनीत मिसळावे. जून-जुलै महिन्यांत पेरणी करावी. पेरणीसाठी फुले गोधन, रुचिरा, फुले अमृता या जातींची ३० सेंमी अंतरावर पाभरीने पेरणी करावी. पेरणीपूर्वी प्रति दहा किलो बियाण्यास २५० ग्रॅम अॅझोटोबॅक्टर हे जिवाणू संवर्धकाची प्रक्रिया करावी. पेरणीसाठी हेक्टरी ४० किलो बियाणे लागते. हेक्टरी १०० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ४० किलो पालाश द्यावे. त्यापैकी ५० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ४० किलो पालाश पेरणीच्यावेळी व उर्वरित ५० किलो नत्र पेरणीनंतर ३० दिवसांनी द्यावे. पीक पन्नास टक्के फुलोऱ्यात (पेरणीनंतर ६५ ते ७० दिवसांनी) असताना कापणी करावी. हिरव्या चाऱ्याचे प्रति हेक्टरी ५०० ते ५५० क्विंटल उत्पादन मिळते.

बाजरी : बाजरी हे हलक्या ते मध्यम जमिनीत घेतले जाणारे तृणधान्य वर्गातील चारा पीक आहे. महात्मा फुले कृषी विद्यापीठाने जायंट बाजरा या वाणाची चाऱ्यासाठी शिफारस केली आहे. या वाणाचा वाढीचा कल उंच असून, लुसलुशीत हिरव्या चाऱ्यात प्रथिनांचे प्रमाणे ७ ते ९ टक्के असते. जून-जुलै महिन्यांत पेरणी करावी. पेरणीसाठी ३० सेंमी अंतरावर प्रति दहा किलो बियाणे पाभरीने पेरावे. पेरणीपूर्वी प्रति १० किलो बियाण्यास २५० ग्रॅम अॅझोटोबॅक्टर हे जिवाणू संवर्धकाची प्रक्रिया करावी. हेक्टरी ९० किलो नत्र, ४० किलो स्फुरद व ३० किलो पालाश द्यावे. त्यापैकी ४५ किलो नत्र, ४० किलो स्फुरद व ३० किलो पालाश पेरणीच्या वेळी व उर्वरित ४५ किलो नत्र पेरणीनंतर ३० दिवसांनी द्यावे. पीक पन्नास टक्के फुलोऱ्यात (पेरणीनंतर ५५ ते ६० दिवसांनी) असताना पिकाची कापणी करावी. हिरव्या चाऱ्याचे प्रति हेक्टरी ४५० ते ५०० क्विंटल उत्पादन मिळते.चवळी : मध्यम ते भारी चांगल्या निचऱ्याच्या जमिनीत चवळी या द्विदलवर्गीय चारा पिकाची पेरणी जून ते ऑगस्ट या कालावधीत करावी. पेरणीसाठी श्वेता, ई.सी.४२१६, बुंदेल लोबिया, यू.पी.सी. ५२८६, या वाणांची ३० सेंमी अंतरावर पाभरीने पेरणी करावी. पेरणीसाठी ४० किलो प्रति हेक्टरी बियाणे वापरावे. पेरणीपूर्वी प्रति दहा किलो बियाण्यास २५० ग्रॅम रायझोबियम जिवाणू संवर्धकाची प्रक्रिया करावी. पिकास २० किलो नत्र व ४० किलो स्फुरद पेरणीच्या वेळी द्यावे. शेत तणाविरहित ठेवून खरीप हंगामात गरजेनुसार १५ दिवसांनी पाणी द्यावे. पेरणीनंतर ६० ते ६५ दिवसांनी कापणी करावी. हिरव्या चाऱ्याचे २५० ते ३०० क्विंटल प्रती हेक्टरी उत्पादन मिळते. चाऱ्यामध्ये १३ ते १५ टक्के प्रथिने असतात.

# फॅमिली कोर्ट बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी ॲड.शिवाजी अण्णा कराळे

## उपाध्यक्षपदी ॲड.अनिता दिघे तर सचिवपदी ॲड.शिवाजी सांगळे

अहिल्यानगर

सुमारे २०० वर्षांची वैभवशाली परंपरा लाभलेल्या शहरातील जुन्या न्यायालयात असलेल्या कौटुंबिक न्यायालयातील वकिलांच्या फॅमिली कोर्ट ॲडव्होकेट्स बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी ॲड शिवाजी अण्णा कराळे यांची तर उपाध्यक्षपदी ॲड.अनिता दिघे, कार्याध्यक्षपदी ॲड.लक्ष्मण कचरे, सचिवपदी ॲड.शिवाजी सांगळे, खजिनदारपदी ॲड.बाबाजी सांगळे व महिला सचिवपदी ॲड पल्लवी दातीर यांच्यासह कार्यकारणी सदस्यांची बिनविरोध निवड झाली. असोसिएशनचे मावळते अध्यक्ष ॲड. लक्ष्मण कचरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या असोसिएशनच्या बैठकीत सर्वानुमते नूतन कार्यकारिणीची बिनविरोध निवड करण्यात आली. या निवडीनंतर सर्व नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. २०२६ ते २८ या दोन वर्षांसाठी या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.



या बैठकीमध्ये असोसिएशनच्या कार्यकारिणी सदस्यपदी जेष्ठ विधिज्ञ ॲड.सुरेश लगड, ॲड.मच्छिंद्र आंबेकर, ॲड.कल्याण पागर, ॲड.पोपट म्हस्के, ॲड.मनीषा केळगंद्रे-शिंदे, ॲड.राजेश कावरे व ॲड.कु.किरण जाधव आदींच्याही सर्वानुमते नियुक्त्या करण्यात आल्या. या बैठकीत अध्यक्ष पदासाठी शिवाजी कराळे यांच्या नावाची सूचना सुरेश लगड यांनी मांडली त्यास राजेश कावरे यांनी अनुमोदन दिले. फॅमिली कोर्ट बार असोसिएशनचे नूतन अध्यक्ष ॲड.शिवाजी अण्णा कराळे हे गेल्या ३१ वर्षांपासून वकील क्षेत्रात कार्यरत आहेत. यापूर्वी त्यांनी २०१३ ते १४ या काळात अहमदनगर बार असोसिएशनच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळली होती. तसेच २०२२ साली ते कौटुंबिक न्यायालय बार असोसिएशनचे संस्थापक अध्यक्षही होते. आता दुसऱ्यांदा या पदाची जबाबदारी ॲड.कराळे यांना मिळाली आहे.

निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ॲड कल्याण पागर यांनी कामकाज पाहिले. यावेळी ॲड.शिवाजी कराळे म्हणाले, जुन्या न्यायालयाला २०० वर्ष पूर्ण झाले आहेत. अशा मोठा ऐतिहासिक वारसा लाभलेल्या या न्यायालयातील फॅमिली कोर्ट बार असोसिएशनच्या अध्यक्षपदाची जबाबदारी मिळणे हे माझे मोठे भाग्य आहे. अध्यक्षपदाची जबाबदारी पुन्हा माझ्यावर टाकून सर्व सदस्यांनी मोठा विश्वास व्यक्त केला आहे. या पदाच्या माध्यमातून वकिलांचे प्रलंबित प्रश्न सोडवण्याबरोबरच बार व बेंच मध्ये सकारात्मक वातावरण ठेवण्यास प्राधान्य देऊ. तसेच सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, पर्यावरण असे विविध क्षेत्रातील उपक्रम राबवण्यावर भर देणार आहे. सर्व वकील बंधुभगिनींना बरोबर कामकाज करणार आहे.

# राजूर गणपती दर्शनासाठी राजमाता जिजाऊ बस सेवा आजपासून सुरु होणार

## बाबासाहेब कोलते यांच्या निवेदनाची महामंडळाकडून दखल

जालना । प्रतिनिधी

तीर्थक्षेत्र राजुर गणपती साठी छत्रपती संभाजीनगर येथून दर तासाला राजमाता जिजाऊ बस सेवा महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने मंगळवारपासून सुरू होणार असल्याची माहिती भाजपा जिल्हा प्रसिध्दीप्रमुख बाबासाहेब कोलते यांनी दिली असून महामंडाळाचे आभार व्यक्त करण्यात येत आहे.



छत्रपती संभाजी नगर ते राजुर गणपती साठी फक्त तीनच बस सेवा कार्यरत होत्या त्यामुळे टाकळी कोलते- पिरबावडा - दाभाडी-तळेगाव व राजुर गणपती परिसरातील शालेय विद्यार्थी यांना जाणे येण्यासाठी व ज्येष्ठ नागरिक व महिला यांना जाणेयेणेसाठी मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत होता त्यामुळे छत्रपती संभाजी नगर येथून राजुर गणपती साठी व राजुर गणपती पासून छत्रपती संभाजी नगर साठी जास्तीच्या बस गाडी सुरू कराव्या म्हणून भाजपा जिल्हा प्रसिध्दीप्रमुख बाबासाहेब पाटील कोलते यांनी फुलंब्री विधानसभा आमदार अनुराधाताई चव्हाण व बदनापूर विधानसभेचे आमदार नारायणराव कुचे व विभाग नियंत्रक परिवहन महामंडळ प्रमोद नेहुल छत्रपती संभाजी नगर यांच्याकडे एका निवेदनाद्वारे मागणी केली होती शालेय विद्यार्थी व जेष्ठ नागरिकांची दखल घेऊन छत्रपती संभाजीनगर ते राजुर गणपती साठी राजमाता जिजाऊ बस सेवा सुरू केल्यामुळे आ. अनुराधाताई चव्हाण, आ. नारायणराव कुचे व परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक प्रमोद नेहुल यांचे आभार व्यक्त करण्यात येत आहे.

# रोहिणी खडसेंचा राम शिंदेंवर पलटवार

## अहिल्यानगरच्या एका धोंड्याला फार मिरची लागली

अहिल्यानगर । प्रतिनिधी

अधिक मासानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या 'धोंडे जेवण' कार्यक्रमावरून सुरू झालेला वाद आता अधिकच चिघळताना दिसत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट)च्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे आणि विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्यातील शाब्दिक संघर्ष पुन्हा एकदा उफाळून आला आहे. रोजगाराच्या मुद्द्यावरून सुरू झालेल्या या वादात आता वैयक्तिक आरोप-प्रत्यारोपांची भर पडली आहे. रोहिणी खडसे यांनी सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमधून राम शिंदे यांच्यावर जोरदार निशाणा साधला. ''आम्ही रोजगाराचा प्रश्न मांडला, बेरोजगार तरुणांसाठी रोजगार मेळावे घ्या असे सांगितले, तर अहिल्यानगर जिल्ह्यातील एका धोंड्याला फार मिरची लागली,'' असा टोला त्यांनी लगावला. नाव न घेता केलेल्या या टीकेचा रोख थेट राम शिंदे यांच्याकडे असल्याचे मानले जात आहे.

रोहिणी खडसे यांनी आपल्या पोस्टमध्ये पुढे भाजपच्या हिंदुत्वाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ''मग त्या धोंड्याने हिंदू संस्कृती जपण्याच्या बाता मारायला सुरुवात केली. पण यांचे हिंदुत्व किती दुटप्पी आहे, हे लोकांनी पाहावे,'' असे त्या म्हणाल्या. यावेळी त्यांनी काही गुन्हेगारी प्रकरणांचा उल्लेख करत, ''हे लोक गुंडांना पोसतात, त्यांना मदत करतात.

# 'कोकण बारडोली' जांभळाला ३०० रुपये किलो भाव

भोकरदन । प्रतिनिधी

पारंपरिक शेतीला फाटा देत काहीतरी वेगळे करण्याची जिद्द असेल, तर शेतीमधूनही उत्तम नफा मिळवता येतो, हे भोकरदन तालुक्यातील सुरंगळी येथील एका शिक्षक कुटुंबाने दाखवून दिले आहे. सुरंगळी शिवारात के. एस. सपकाळ या शिक्षकाने आपल्या शेतात फुलवलेल्या 'कोकण बारडोली' जातीच्या जांभळाला बाजारात तब्बल ३०० रुपये प्रति किलोचा विक्रमी भाव मिळाला आहे. विशेष म्हणजे, या जांभळाची चव आणि गुणवत्ता पाहून छत्रपती संभाजीनगरमधील काही ग्राहकांनी थेट एक क्विंटल जांभळाची 'ॲडव्हान्स बुकिंग' करून ठेवली आहे, अशी माहिती फळबाग मालकाने दिली.



जून महिना सुरू झाला असून, सध्या आंब्याचा सिझन आता शेवटच्या टप्प्यात आला आहे. आंब्याचा हंगाम संपत असतानाच जांभूळ हे फळ परिपक्व होऊन बाजारात दाखल होते. सध्या बाजारपेठेत गावरान आणि इतर विविध जातींची जांभळे थोड्याफार प्रमाणात विक्रीसाठी येत आहेत. अशातच सुरंगळी येथील सपकाळ कुटुंबाच्या बागेतील दर्जेदार, टपोरी आणि चवदार जांभळे ग्राहकांचे मुख्य आकर्षण ठरत आहेत.

सुरंगळी येथील सपकाळ कुटुंबाने आपल्या शेतात चार वर्षांपूर्वी कोकण बारडोली जातीच्या जांभळाची लागवड केली होती. सध्या ही झाडे चार वर्षांची झाली असून, त्यातून चांगल्या प्रकारे उत्पादन मिळण्यास सुरुवात झाली आहे. यावर्षी बागेत जवळपास ३० ते ३५ टक्के बहार आला असून, पहिली तोडणी (हाताळणी) यशस्वीपणे पूर्ण झाली आहे.

पहिल्याच तोडणीत निघालेल्या एक क्विंटल जांभळांना जळगाव येथील बाजारपेठेत ३०० रुपये किलो याप्रमाणे उच्चांकी दर मिळाला आहे. या जांभूळ बागेविषयी अधिक माहिती देताना बागायतदार सुखदेव विठ्ठल सपकाळ यांनी सांगितले की, त्यांच्या बागेत सध्या ५०० पेक्षा जास्त जांभळाची झाडे आहेत. विशेष म्हणजे, ही संपूर्ण बाग कोणत्याही रासायनिक खतांचा किंवा औषधांचा वापर न करता, पूर्णपणे नैसर्गिक व सेंद्रिय पद्धतीने जोपासण्यात आली आहे. यामुळे या जांभळांना अत्यंत उत्कृष्ट आणि नैसर्गिक चव आहे. जांभळाला आता मागणी वाढू लागली असल्याचे सांगण्यात आले. ''जांभळाचा हा सिझन आता पुढील एक महिनाभर चालणार आहे. आमच्या बागेतील दर्जेदार माल व्यवस्थित पॅकिंग करून थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवला जात आहे. कोणत्याही रसायनांशिवाय नैसर्गिकरत्याा ही फळे तयार होत असल्याने शहरी भागासोबतच ग्रामीण भागातही या जांभळांना प्रचंड मागणी आहे. पहिल्याच तोडणीला मिळालेला दर आणि ग्राहकांचा प्रतिसाद उत्साहवर्धक आहे.

जाहिर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ०५/२०२६**
**प्रभू पि.रंगनाथ घोषीर विरुद्ध**
**ग्रामपंचायत कार्यालय मंझेरी हवेली**

पहा

१.प्रभू पि.रंगनाथ घोषीर रा.मंझेरी हवेली ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्ममृत्यु नोंद दावा प्रकरण विधिज्ञ मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत रंगनाथ दौलतराव घोषीर यांचा दिनांक ०२/०१/२०२२ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्ममृत्यू नोंदवही मध्ये घेण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहून येस जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय /न.प कार्यालयस मंझेरी हवेली ता. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर होऊन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे मंझेरी हवेली ता. जि. बीड येथील जन्ममृत्यू रजिस्टर ला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनाक ०६/०६/२०२६ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख ०६/०७/२०२६ ही आहे


**स्वाक्षरीत**
**तहसिलदार, बीड**

# प्रगतिशील शेतकरी:चिया शेतीतून साडेचार महिन्यांत २ एकरांत दीड लाख उत्पन्न

## जालना जिल्ह्यातील भाटेपुरीच्या शेतकऱ्याचा प्रयोग

जालना । प्रतिनिधी

हवामानातील बदल, उत्पादन खर्चात होणारी वाढ आणि पारंपरिक पिकांना मिळणारे अनिश्चित दर यामुळे शेतकरी पर्यायी पिकांच्या शोधात आहेत. अशा परिस्थितीत जालना तालुक्यातील भाटेपुरी येथील शेतकरी प्रल्हाद साहेबराव गाढे यांनी चिया सीडच्या शेतीचा यशस्वी प्रयोग केला. गाढे यांनी दोन एकर क्षेत्रावर चिया सीडची लागवड करून अवघ्या साडेचार महिन्यांत सुमारे दीड लाख रुपये उत्पन्न मिळवले. त्यांच्या या प्रयोगाची पंचक्रोशीत जोरदार चर्चा सुरू आहे.





पीक वाढीचा कालावधी कमी असल्याने साडेतीन महिन्यांतच चियाचे उत्पादन हातात आले. विशेष म्हणजे या पिकासाठी बियाणांच्या खर्चाशिवाय कोणताही मोठा खर्च करावा लागला नाही. दोन एकर क्षेत्रातून त्यांना एकरी सुमारे चार क्विंटल उत्पादन मिळाले. त्यामुळे एकूण आठ क्विंटल चिया सीडचे उत्पादन झाले. सध्या बाजारात चिया सीडला १८ ते २० हजार रुपये प्रतिक्विंटल दर मिळत असल्याने या उत्पादनातून त्यांना चांगला आर्थिक लाभ झाला. सध्या बहुतांश शेतकरी सोयाबीन, कापूस, मका किंवा ज्वारीसारख्या पारंपरिक पिकांवर अवलंबून आहेत. मात्र वाढता उत्पादन खर्च आणि बाजारभावातील चढ-उतार यामुळे अपेक्षित नफा मिळत नाही. याउलट चिया सीड हे कमी कालावधीचे, कमी खर्चाचे आणि चांगला दर मिळवून देणारे पीक आहे. चिया सीड हे साल्व्हिया हिस्पॅनिका या वनस्पतीचे बी असून त्याचा उगम मेक्सिको व मध्य अमेरिकेतील देशांमध्ये झाला. ओमेगा-३ फॅटी ॲसिडचा हा समृद्ध स्रोत आहे. यात प्रथिने, फायबर, कॅल्शियम आणि लोह मुबलक प्रमाणात असुन हृदयविकाराचा धोका कमी करण्यास मदत करते. त्याशिवाय पचनक्रिया सुधारण्यास हे उपयुक्त ठरते आहे. वजन नियंत्रणासाठी चीआ सीड फायदेशीर आहे. मधुमेह रुग्णांमध्ये रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्यास सहाय्यक असुन हेल्थ ड्रिंक, बेकरी पदार्थ, सलाड आणि विविध खाद्यपदार्थांमध्येही याचा वापर केला जातो. चिया सीड अत्यंत कमी पाण्यावर येते. त्यावर कोणत्याही मोठ्या रोगराईचा प्रादूर्भाव होत नाही. याला हरिन,रानडुकरं आणि कोणतेही जणावरे खात नाही त्यामुळे राखणीचा खर्च नाही. एक किंवा दोन वेळा नीम अर्कची फवारणी केली. अवघ्या साडेचार महिन्यात पीक हाती आले. विदर्भातील वाशिम येथे याची बाजारपेठ आहे. मात्र, व्यापाऱ्याने १७५०० रुपये क्विंटल दर देत बांधावर येऊन खरेदी केल्याचे शेतकरी गाढे यांनी सांगितले. तर फुलोरा येईपर्यंत दोन किंवा तीन वेळा पाणी द्यावे. त्यानंतर पाण्याची गरज नसल्याचे सहाय्यक कृषी अधिकारी सतीश कमाने यांनी सांगितले.

जाहिर प्रगटन

**जाहिर प्रगटन देणार -निलेश पि. बाबासाहेब भालेकर**
**वय: ४३ वर्षे, धंदा: शेती**
**रा. सौंदाना ता.पाटोदा जि.बीड**

बीड जिल्हयातील प्रामुख्याने पाटोदा तालुक्यातील मौजे सौंदाना, वैदयकिन्ही व तमाम परिसरातील सर्व जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, जाहिर प्रगटन देणार यांची मौजे सौंदाना ता. पाटोदा जि.बीड येथे शेतजमीन असून सदर शेजमीन ही त्यांची आई नामे आशाबाई बाबासाहेब भालेकर गट नंबर २८० क्षेत्र ०१ हे. ०० आर व तसेच वडिल बाबासाहेब दत्तुबा भालेकर यांचे नावे गट नं. २८० मधील क्षेत्र ०१ हे. १८ आर व माझे नावे गट नंबर २८० मधील क्षेत्र ०० हे. ६० आर असे एकूण क्षेत्र ०२ हे. ७८ आर एवढे क्षेत्र आमच्या कुटूंबाच्या नावे असून सदरील गट नं. २८० मधील शेतजमीन कुटूंबाच्या नावे वेगवेगळी असली तरी परंतु संपुर्ण क्षेत्र एकलगत आहेत. सदरील जमीन ही जाहिर प्रगटन देणार स्वतः वहिती करीत आहे. गट नं. २८० मधील एकुण क्षेत्र ०२ हे. ७८ आर ची चतु:सिमा खालीलप्रमाणे आहे.

पूर्वेस -गट नं. ३३६, ३३७ मधील शेतजमीन
पश्चिमेस :- कदम यांची जमीन
दक्षिणेस :-पाटोदा-मांजरसुंबा रस्ता,
उत्तरेस :-गट नं. ३३८ मधील शेतजमीन

या चतुः सिमेअंतर्गत जमीन असून या शेतजमीनीमध्ये इतर कोणीही कसल्याही प्रकारे अतिक्रमण करू नये, करीता हे जाहिर प्रगटन

दिनांक: १५/०६/२०२६
स्थळ: पाटोदा

**जाहिर प्रगटन देणार**
स्वाक्षरित
**निलेश पि. बाबासाहेब भालेकर**

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-५५०**
**दिनांक -०३/०६/२०२६**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती बळीराम शिवनाथ टकले रा. राहिलागड ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या वडिलाच्या जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शिवनाथ किसन टकले | वडील | २०/११/२००३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-०३/०६/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-५६४**
**दिनांक -०५/०६/२०२६**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती रंजनी रमेश पडाकांती रा.१३५४/४ गणेश नगर कॉलनी, कुंटलूर, ह्यात नगर, ता. अब्दुल्ला मंडळी जि रंगरेड्डी यांनी यांच्या पतीच्या जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| १ | रमेश कृष्णमूर्ती पडाक्रांती | पती | ०१/०६/२०२५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-०५/०६/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# अर्भक मृत्यू प्रकरणात निष्काळजीपणा भोवला

## वैद्यकिय अधिकारी निलंबीत, दुसऱ्याची वेतनवाढ रोखली तर चालकास कार्यमुक्त केले

हिंगोली। प्रतिनिधी

औंढा नागनाथ तालुक्यातील जवळाबाजार येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रसूतीसाठी आलेल्या महिलेस रुग्णवाहिका उपलब्ध न करून दिल्याने अर्भकाचा मृत्यू झाला. या प्रकरणात निष्काळजीपणाच्या कारणावरून एक वैद्यकिय अधिकारी निलंबीत करण्यात आला असून, एकाची वेतनवाढ थांबविण्यात आली तर चालकास कार्यमुक्त करण्याचे आदेश जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी दिले आहेत.

नालेगाव येथील एक गरोदर महिला उपचारासाठी जवळा बाजार येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल झाली होती. मात्र महिलेची प्रकृती अस्वस्थ असल्याने त्यांना उपचारासाठी हिंगोली येथे जाण्याचा सल्ला देण्यात आला. मात्र केंद्राच्या रुग्णवाहिकेसाठी डिझेल व चालक नसल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे महिलेच्या कुटुंबियांनी खाजगी रुग्णवाहिकेद्वारे हिंगोली येथे नेले. मात्र यावेळी प्रसुती दरम्यान, महिलेच्या पोटातील अर्भकाचा मृत्यू झाला. या प्रकरणाची गंभीर दखल घेत जि. प. मुख्यकार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी चौकशीचे आदेश दिले होते. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गजानन चव्हाण यांच्या पथकाने चौकशी करून जिल्हा परिषदेकडे अहवाल सादर केला होता.

# आष्टी तालुक्यातील पाणीटंचाईवर आ. सुरेश धस यांचा आढावा

## अकरा गावांसाठी टँकरचे प्रस्ताव दाखल, तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यात निर्माण होऊ घातलेल्या संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर आमदार सुरेश धस यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांसोबत संयुक्त बैठक घेत तालुक्यातील पाणीस्थितीचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी गावनिहाय उपलब्ध पाणीसाठा, आरक्षित पाणीसाठ्याची स्थिती तसेच ग्रामीण भागातील टंचाईग्रस्त गावांना पिण्याच्या पाण्यासाठी टँकर उपलब्ध करून देण्याबाबत चर्चा करण्यात आली. तालुक्यातील कासारी मुर्शदपूर, शिंदेवाडीसह अकरा गावांसाठी पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरू करण्यासाठी गटविकास अधिकारी बागलाने यांच्याकडे प्रस्ताव दाखल करण्यात आले आहेत.



राज्याचे मुख्यमंत्री मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांनी अलनिनोच्या प्रभावामुळे शेतकऱ्यांनी पेरणीबाबत दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्या अनुषंगाने आष्टी तालुक्यात संभाव्य पाणीटंचाईची परिस्थिती लक्षात घेऊन आवश्यक उपाययोजनांचे नियोजन करण्यात आले. काही गावांसाठी पाणी टँकर मंजूर करण्यात आले असून, उर्वरित गरजू गावांनाही वेळेत पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित यंत्रणांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.

बैठकीत मेहकरी, कडा, कडी आणि कांबळी या प्रकल्पांमध्ये आरक्षित पाणीसाठा उपलब्ध असल्याची माहिती संबंधित विभागांकडून देण्यात आली. या प्रकल्पांमधून टंचाईग्रस्त गावांचा पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी योग्य नियोजन करण्याच्या सूचना आमदार धस यांनी केल्या. तसेच पावसाचा विलंब झाल्यास आणि पाणीटंचाईची तीव्रता वाढल्यास परिस्थितीनुसार तातडीच्या उपाययोजना राबविण्याबाबतही चर्चा झाली.या बैठकीस तालुका महसूल व दंडाधिकारी सौ. वैशाली पाटील, महावितरणचे उपअभियंता श्री. देशमुख, जलसंपदा विभागाचे उपविभागीय अधिकारी श्री. सिनारे, पाणीपुरवठा विभागाचे उपविभागीय अधिकारी श्री. सदगर यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

आगामी काळात नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा कोणताही त्रास होऊ नये, यासाठी प्रशासनाने सतर्क राहून समन्वयाने काम करण्याचे निर्देश आमदार सुरेश धस यांनी यावेळी दिले.

### अकरा गावांचे प्रस्ताव दाखल

गतवर्षी पावसाने ओढ दिल्याने आष्टी तालुक्यासह संपूर्ण परिसरात यंदा तीव्र पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. भूजल पातळी खालावल्याने अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असून, नागरिकांना उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर कासारी-मुर्शदपूर, शिंदेवाडीसह आष्टी तालुक्यातील एकूण ११ गावांसाठी पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरू करण्यात यावेत, यासाठी पंचायत समिती आष्टीचे गटविकास अधिकारी गोकुळ बागलाने यांच्याकडे अधिकृत प्रस्ताव सादर करण्यात आला.

यावेळी कासारी-मुर्शदपूर ग्रामपंचायतीचे सरपंच अशोक मुळे, उपसरपंच जालिंदर वांढरे, ग्रामपंचायत सदस्य मनोज धनवडे, कपिल अग्रवाल आदी उपस्थित होते. ग्रामस्थांच्या वतीने पाणीटंचाईची गंभीरता मांडत तातडीने

◀◀ पान ३ वर

# २५ लाखांचा निधी : खर्च साडेचार लाख, काम मात्र अर्धवट

## भगवानबाबा मंदिर-जुना कासारी पाणंद रस्ता आजही धुळीच्या खाईत, नागरिकांचा आमरण उपोषणाचा इशारा

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी शहरालगत असलेल्या भगवानबाबा मंदिर ते जुना कासारी पाणंद रस्ता (जुना आष्टी-कासारी मार्ग) या महत्त्वाच्या रस्त्याच्या कामात गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. सदरील रस्त्यासाठी २५ लाखांचा निधी मंजूर करण्यात आला असताना, प्रत्यक्षात काम पूर्ण





न करता ४.५० लाखांची रक्कम खर्च दाखवून उचलण्यात आल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.

मागील वर्षी पावसाळ्यात या रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली होती. त्यामुळे परिसरातील महिला व पुरुष नागरिकांनी तहसील कार्यालयात धाव घेऊन तत्कालीन तहसीलदार यांना निवेदन दिले होते. त्यानंतर तहसीलदारांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र वर्ष उलटूनही परिस्थितीत कोणतीही सुधारणा झालेली नाही.

या मार्गालगत अनेक शेतकरी वास्तव्यास असून कासारी बाजूला सुमारे ३० घरांची पारधी

◀◀ पान ३ वर



बीड : शाळा प्रवेशोत्सव खोकरमोहा, ता. शिरूर येथील शाळेत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी शालेय विद्यार्थ्यांचे स्वागत केले. जिल्ह्यातील सर्वच शाळांमध्ये या स्वरूपाचा प्रवेशोत्सव कार्यक्रम आज आयोजित करण्यात आला होता यातील मुख्य कार्यक्रम खोकर मोहा येथील शाळेत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी शाळा सजविण्यात आल्या होत्या तसेच शाळेसमोर रांगोळ्या देखील काढण्यात आल्या होत्या खोकरमोहा येथील शाळेत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते वृक्षारोपण देखील या निमित्त करण्यात आले.

# परळीतून महायुतीचे उमेदवार बस्वराज पाटील यांना एकगठ्ठा मतदान करण्याचे धनंजय मुंडे यांचे आवाहन

परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी

परळी वैद्यनाथ येथील सर्व नगरसेवक यांनी आपले पहिल्या पसंतीचे मत महायुतीचे अधिकृत उमेदवार बस्वराज पाटील यांच्या पाठीशी उभे करावे, असे आवाहन माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी आज संपन्न झालेल्या बैठकीत केले आहे.

बीड - लातूर - धाराशिव स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून विधानपरिषदेचे महायुतीचे उमेदवार बस्वराज पाटील यांनी आज धनंजय मुंडे यांची नाथरा



महायुतीचे बीड - लातूर - धाराशिवचे उमेदवार बस्वराज पाटील यांनी घेतली धनंजय मुंडे यांची भेट

येथील निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. यावेळी श्री. मुंडे यांनी बस्वराज पाटील यांचे स्वागत केले. तसेच याप्रसंगी परळीतील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व मित्र पक्षाच्या नगरसेवकांची बैठक घेऊन त्यांना मतदानाचे आवाहन केले. यावेळी युवक नेते अजय मुंडे, दिव्यांग कल्याण महामंडळाचे डॉ. संतोष मुंडे, बाजीराव भैय्या धर्माधिकारी, रामेश्वर मुंडे, उपनगराध्यक्ष राजा खाँ पठाण, रवींद्र गित्ते, भावड्या कराड, जयपाल लाहोटी, प्रणव परळीकर यांसह परळी वैद्यनाथ शहरातील विविध वॉर्डातील नगरसेवक आदी उपस्थित होते.

# जिल्हाधिकारी कार्यालयासमोर रांजण ठेवले पण पाणीच नाही ! गांधीगिरीतून प्रशासनाचा सामाजिक कार्यकर्त्यांकडून निषेध

बीड । प्रतिनिधी

शासकीय कार्यालयांमध्ये कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांना तसेच आंदोलनकर्त्यांना पिण्याच्या पाण्याची मोफत सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी वारंवार निवेदने व लक्ष्यवेधी आंदोलने झाल्यानंतर जिल्हा प्रशासनाने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ दोन रांजण ठेवून पाणपोई सुरू केल्याचे दाखविले. मात्र काही दिवसांतच ही व्यवस्था केवळ दिखाऊ ठरल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे.

या रांजणांमध्ये नियमितपणे



पाणी भरले जात नसल्याने पाणपोई अनेकदा कोरडी राहत असून नागरिकांची गैरसोय होत आहे. या कथित निष्काळजीपणाच्या निषेधार्थ सोमवारी (दि. १५) डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली कोरड्या रांजणाला पुष्पहार अर्पण करून व श्रीफळ फोडून गांधीगिरीच्या मार्गाने जिल्हा प्रशासनाच्या संवेदनहीन कारभाराचा निषेध करण्यात आला.

यावेळी प्रशासनाने जिल्हाधिकारी कार्यालय, तहसील कार्यालय, पंचायत समिती, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद आदी शासकीय कार्यालयांमध्ये येणाऱ्या नागरिकांसाठी कायमस्वरूपी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, तसेच आंदोलनकर्त्यांसाठी निवारा शेड व स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली.

या आंदोलनात शेख युनुस, मुबीन शेख, भिमराव कुटे, सय्यद सादेक, रामधन जमाले, पठाण रफिक, गणेश पांचाळ, आकाश कळसकर , अँड.योगेश टेकाडे आदी सहभागी झाले होते.

# ना. पंकजाताईंच्या पाठिंब्यावर आमदार झालेल्या प्रकाश सोळंकेंनी कृतघ्नपणाची परिसीमा गाठली

## मराठा-ओबीसी वाद पेटवण्याचे षडयंत्र सुरू आहे का? पत्रकार परिषदेत भाजप पदाधिकाऱ्यांचे प्रतिउत्तर

माजलगाव । प्रतिनिधी

महायुतीचे आमदार प्रकाश सोळंके यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती कार्यक्रमात मंत्री पंकजा मुंडे यांच्यावर केलेल्या आरोपांना भाजप पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषदेत जोरदार प्रत्युत्तर दिले. यापूर्वीही आमदार सोळंके यांनी पंकजा मुंडे यांच्यावर आरोप केले होते. मात्र, ''आमदार साहेबांच्या वयाचा मान राखून कोणतेही प्रतिउत्तर द्यायचे नाही,'' अशी भूमिका पंकजा मुंडे यांनी घेतल्याने कार्यकर्त्यांनी संयम पाळला होता. मात्र, आता वारंवार होणाऱ्या बिनबुडाच्या आरोपांना उत्तर देण्यासाठी पत्रकार परिषद घेत असल्याचे पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

आमदार प्रकाश सोळंके यांनी मराठा आरक्षणाला पाठिंबा दिल्यामुळे त्यांच्या विरोधात पंकजा मुंडे यांनी ओबीसी उमेदवार उभा केल्याचा आरोप केला होता. हा आरोप साफ खोटा असून, श्रद्धेय मनोज जरांगे पाटील यांच्याबाबत केलेल्या वक्तव्यामुळे सामाजिक उद्रेकातून आमदार सोळंके यांच्या घराची जाळपोळ झाली होती. त्या घटनेनंतर त्यांनीच मराठा आरक्षणाला पाठिंबा असल्याचे सांगत माफी मागितली होती. त्यामुळे आता पंकजा मुंडे यांच्यावर अशा प्रकारचे आरोप करणे केविलवाणे असल्याची टीका करण्यात आली.



विधानसभा निवडणुकीदरम्यान पंकजा मुंडे यांनी सर्व कार्यकर्त्यांना महायुती धर्म पाळून प्रकाश सोळंके यांच्या विजयासाठी प्रामाणिकपणे काम करण्याचे आदेश दिले होते. काही गावांमध्ये भाजप तिसऱ्या क्रमांकावर असल्याची वस्तुस्थिती सांगूनही ''लोकसभेतील मतभेद विसरून महायुतीचा उमेदवार निवडून आणायचा आहे,'' अशी भूमिका त्यांनी घेतली होती. त्यामुळे प्रकाश सोळंके यांचा विजय हा पंकजा मुंडे आणि भाजप कार्यकर्त्यांच्या पाठिंब्यामुळेच शक्य झाला, हे त्यांनी विसरू नये, असा टोला लावण्यात आला. खर तर प्रकाश सोळंके यांच्या निवडणूक निकालानंतर अनेक ठिकाणी त्यांचे स्वागत करण्यात आले त्यावेळी अनेक भाषणामध्ये बोलताना त्यांनी उल्लेख केला होता की भाजपच्या पंकजा मुंडे सह भाजपाच्या पदाधिकाऱ्यांनी खूप मेहनत घेतली त्यामुळे हा विजय मिळालेला आहे , पण आता पलटवार करत वारंवार अशी खोटे चुकीचे आरोप का करत आहेत.

बंडखोर उमेदवार उभा करण्याचा प्रश्न उपस्थित करताना पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, राजाभाऊ मुंडे यांचे चिरंजीव बाबरी मुंडे यांना बंडखोर म्हणून उभे करण्यामागे स्वतः प्रकाश सोळंके यांचाच हात होता. बाबरी मुंडे यांनी अपक्ष उमेदवारी दाखल केल्यानंतर पंकजा मुंडे यांनी त्यांची पक्षातून हकालपट्टी करत, ''बाबरी मुंडे हा माझा उमेदवार नसून त्याला कोणीही मतदान करू नये,'' असे व्हिडीओ संदेश आणि जाहीर सभांमधून स्पष्टपणे सांगितले होते. मात्र, काही महिन्यांतच

◀◀ पान ३ वर

# शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी तहसीलदार शेळके जरुडमध्ये

बीड । प्रतिनिधी

प्रशासन केवळ कार्यालयाच्या चार भिंतीत मर्यादित न राहता ते थेट जनतेच्या दारी पोहोचले तरच त्याला खऱ्या अर्थाने लोकाभिमुख स्वरूप प्राप्त होते . याच विचारातून बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी आज मौजे जरूड येथे भेट देत एकाच दिवशी शिक्षण आणि शेती या ग्रामीण जीवनाच्या दोन महत्त्वाच्या घटकांशी थेट संवाद साधला .

नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी जिल्हा परिषद शाळेला भेट देत त्यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले . शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा उत्साह , नवीन पुस्तके , नवीन



गणवेश आणि नव्या स्वप्नांची चाहूल यामध्ये सहभागी होत तहसीलदार शेळके यांनी विद्यार्थ्यांना नियमित शिक्षण , शिस्त आणि संस्कारांचे महत्त्व पटवून दिले . ग्रामीण भागातील प्रत्येक विद्यार्थी हा भविष्यातील सक्षम नागरिक असून शिक्षणाच्या माध्यमातूनच समाजपरिवर्तन घडू शकते , असा विश्वास त्यांनी व्यक्त केला . विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहावीत , जिद्द आणि परिश्रमाच्या बळावर ती पूर्ण करावीत , असे आवाहनही त्यांनी केले .

त्यानंतर त्यांनी जरूड परिसरातील शेतशिवारात जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला . यंदाच्या मान्सूनची स्थिती , पावसाचे अनियमित आगमन आणि खरीप हंगामाच्या तयारीचा आढावा घेत त्यांनी शेतकऱ्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या . काही ठिकाणी जमिनीची मशागत , वखरणी , पाळे देण्याची कामे सुरू असल्याची पाहणी करण्यात आली. यावेळी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी घाईघाईने पेरणी करू नये , असा सल्ला दिला . प्रारंभीच्या हलक्या पावसावर विश्वास ठेवून पेरणी केल्यास पुढे पावसाचा खंड पडल्यास दुबार पेरणीचे संकट निर्माण होऊ शकते . त्यामुळे पुरेसा आणि समाधानकारक

◀◀ पान ३ वर

# कवडगाव ग्रामपंचायतीकडून विकासकामांना वेग

## गावच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य-सरपंच शेख बशीरभाई

वडवणी । प्रतिनिधी

कवडगाव ग्रामपंचायत अंतर्गत गावाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध विकासकामांना प्राधान्य देण्यात येत असून, नागरिकांच्या मूलभूत सुविधांकडे विशेष लक्ष दिले जात असल्याची माहिती सरपंच शेख बशीरभाई यांनी दिली. गावातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, शिक्षण, सुरक्षा आणि नागरिकांच्या सुविधांसाठी अनेक महत्त्वपूर्ण कामे पूर्ण करण्यात आली असून काही कामे प्रगतिपथावर आहेत.



गावातील वंजारवाडी वस्ती रस्ता खडीकरण व मजबुतीकरण या महत्त्वपूर्ण कामाचे उद्घाटन नुकतेच करण्यात आले. या रस्त्यामुळे नागरिकांची वाहतूक सुलभ होणार असून शेतकरी व ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळणार आहे. गावातील पाणीपुरवठा सुरळीत राहावा यासाठी सौर ऊर्जा पॅनल बसविण्यात आले असून, विजेवरील अवलंबित्व कमी करून पाणीपुरवठा व्यवस्था अधिक सक्षम करण्यात आली आहे. तसेच गावातील सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत.

ग्रामस्थांच्या सुविधांसाठी गावात पथदिवे बसविण्याचे काम सुरू असून, रात्रीच्या वेळी नागरिकांना सुरक्षित वातावरण मिळणार आहे. शिक्षण क्षेत्रातही ग्रामपंचायतीने पुढाकार घेत जि.प. शाळेतील विद्यार्थ्यांसाठी

◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26